
# जणू काही वास्तव

( दोन अंकी नाटक )

चं. प्र. देशपांडे



# जणू काही वास्तव

**( दोन अंकी नाटक )**

**-- चं.प्र.देशपांडे**

**-- अंक पहिला --**

( काही कुत्री भुंकण्याचे आवाज येत असताना पडदा उघडला जातो. दोन क्षणांनी अमर, अकबर आणि अँथनी हुंगत हुंगत प्रवेश करतात. नंतर -- )

अमर : - काही कळत नाही राव !

अकबर : - या अकबरची पण तीच हालत आहे !

अँथनी : - आपण तर जगप्रसिध्द अमर, अकबर आणि अँथनी ! आपण शिकारी कुत्रे ! आणि आपल्याला व्हिलन शोधणं जमू नये !

अकबर : - के.एन. सिंग, प्राण, अमरीश पुरी हे खलनायक आपल्याला माहीत आहेत -- त्यांचा वास आपल्याला लगेच येतो --ते सुटू शकणार नाहीत ! या नाटकात कुणी नवीनच खलनायक तर घेतला नसेल !

अमर : - त्या रोलमध्ये कुणीही असू दे -- तो आपल्याला कळतोच -- मला तर वेगळीच शंका येतीय -- या नाटकात बहुतेक उघडउघड ओळखता येणारा व्हिलन नसेलच !

अँथनी : - मग अवघड होईल काम आपलं -- व्हिलन कोण हे कळलंच नाही तर आपण एकत्र येणारच कसे ?

अकबर : - आणि वेगवेगळ्या धर्मांचे असून आपली एकत्रितपणे एकच शक्ती तयार होण्याचा ड्रामा तरी कसा घडणार ?

अमर : - इथं कदाचित आपल्या सवयीचे व्हिलन नसतील !

अँथनी : - व्हिलन ओळखायचा कसा हे आपण ठरवून ठेवू या !

अकबर : - एरवी ही गोष्ट आधीच ठरलेली असते !

अमर : - दुष्ट असला की त्याला व्हिलन म्हणावं ! खून करणारा, कायदा मोडणारा, देशद्रोही !

अकबर : - आणि असा तो नसलाच तर ?

अँथनी : - वेडा आहेस ! मग आपल्याला उपयोग काय त्याचा ?

अमर : - आपण विचार करू या !

अकबर : - ही आपल्याला जमणारी गोष्ट नाही ! विचार करणं !

अँथनी : - नवीन विचार कसला करायचा ? व्हिलन हा वेगळाच पाहिजे आणि ठरलेलाच पाहिजे !

अमर : - बरं ते जाऊं दे, सध्या आपलं इथं काम काय आहे ते माहीत आहे ना ?

अकबर : - आपण अमर, अकबर, अँथनी -- आपल्या बुध्दीला झेपणारं काम असेल तर आपण करू !

अमर : - मारामारीची कामं नाहीयत !

अँथनी : - मग ?

अमर : - आपल्या या नाटकाची नायिका म्हणजे हिरॉईन आहे -- नम्रता ! तिचं लग्न ठरवणं चाललंय ! आपण तिच्या आजूबाजूला राह्यचं आहे --

अकबर : -		तिचं रक्षण करायचं आहे ?

अमर : -		शक्य तर !

अकबर : -		का ?

अमर : -		कारण ती चांगली आहे, प्रामाणिक आहे, हुशार आणि वेगळी आहे.

अँथनी : -		ते ठीक -- कुणापासून ? कुणापासून करायचंय रक्षण ?

अमर : -		व्हिलन कोण आहे हे कळलं तर अर्थात् त्याच्यापासून !

अकबर : -		नाहीच कळलं तर माकडं होतील आपली ! ( भुंकत जातो. )

अँथनी : -		आपल्याला एकत्र आणायला असं काहीतरी असायलाच लागेल तिच्याकडं -- अरे तो उगीचच कुणावर तरी जाईल धावून ! चल, चल !			(

( दोघेही भुंकत जातात. आता श्री. रामदास संत, ५५, यांचे घर. ते एल.आय.सी.मध्ये ऑफिसर आहेत. त्यांची पत्नी सरिता, ५०, ही शिक्षिका आहे. या दोघांची मुलगी नम्रता, २५, ही मानसशास्त्रात एम. ए. झालेली असून लग्नाची आहे. तिच्यासाठी स्थळ आणणारे मध्यस्थ श्री. ठकार, ६२, हे एका राष्ट्रीयीकृत बँकेतून मॅनेजर पदावरून निवृत्त झालेले आहेत. त्यांनी आणलेले स्थळ हे श्री. विष्णू देव, ५७, यांचा मुलगा प्रसाद, २८, याचे आहे. श्री. देव हे सिव्हिल इंजिनियर असून जुन्या वास्तूंचा जीर्णोध्दार -- पुनरुज्जीवन यात त्यांचे विशेष नाव आहे. आणि त्याच कामाचा त्यांचा व्यवसाय आहे. त्यांची पत्नी मीना, ५२, ही गृहिणी आहे. प्रसाद हा संगणक-अभियंता असून एका संगणक -- क्लासमध्ये फॅकल्टी म्हणून नोकरी करतो. शिवाय तो एक कथाकारही आहे. सुट्टीचा दिवस असून संध्याकाळची वेळ आहे. रामदास वर्तमानपत्र चाळत दिवाणावर पडलेले. काही क्षणांनी उठतात, वर्तमानपत्र घडी करून ठेवतात आणि दिवाणावरची चादर झटकून नीट करतात. )

रामदास :-		सरिता, ए सरिता -- साडेपाच वाजले. ठकार येतील हं एवढ्यात -- मला हे आता जमण्यासारखं वाटतंय -- इकडे ये -- त्यांच्याशी बोलायचे मुद्दे तयार ठेवले पाहिजेत --

सरिता :-		( आतूनच -- ) आले --

रामदास :-		काय विचारायचं आणि काय सांगायचं -- दोन्ही तयार हवं --

सरिता :-		( बाहेर येते. ) नवीन तयार काय करायचंय ? जे आहे ते आहे -- लपवाछपवी थोडीच करायचीय आपल्याला ? आणि आहेच काय असं लपवण्यासारखं ?

रामदास :-		असं म्हणू नकोस ! हल्ली ऐकतो आपण एकेक गोष्टी ! आधीच काळजी घेतलेली बरी !

सरिता :-		तुम्ही एल.आय.सीत ऑफीसर, मी शिक्षिका आणि आपली नम्रता मानसशास्त्राची एम.ए. उत्तम स्थळ आहे आपलं. तब्येतही चांगली ठणठणीत आहे तिची.

रामदास :-		ते आहे म्हणा !

सरिता :-		’ ते आहे ’ म्हणजे काय, कसली कमतरता वाटतेय की काय तुम्हाला ? मुद्दे कसले ठरवताय । ?

रामदास :-		पण मला आपलं एक वाटतं --

सरिता :-		काय ?

रामदास :-		एक गोष्ट आपण आधीच क्लिअर करावी -- नंतर असं नको कुणी म्हणायला की ही गोष्ट तुम्ही आधी का बोलला नाहीत -- असं --

सरिता :-		कुठली गोष्ट ?

रामदास :-		मला असं वाटतं की नम्रता जरा स्वतंत्र विचाराची आहे, ते आपण त्यांना सांगून टाकावं --

सरिता :-		अहो, स्वतंत्र विचाराची असणं हा काही एखादा रोगबीग आहे की काय ?! यात असं डिफेन्सिव्ह

राहण्यासारखं काय आहे ?

रामदास :- रोग नाहीय पण वेगळेपणा आहे ना ! प्रॉब्लेम होऊ शकतो नंतर !

सरिता :- मला सांगा, तुम्ही न् मी स्वतंत्र विचाराचे आहोत की नाही आहोत ?

रामदास :- मला नाही वाटत की आपल्याला कुणी स्वतंत्र विचाराचे म्हणेल !

सरिता :- का नाही म्हणणार याचा केलात विचार ?

रामदास :- का ?

सरिता :- बहुसंख्य लोकांचे स्वतंत्र विचार एकसारखेच असतात आणि आपले तसेच आहेत म्हणून ! सगळे स्वतंत्र विचाराचेच असतात !

रामदास :- करेक्ट ! यू हॅव हिट द नेल ऑन द हेड ! म्हणूनच सगळ्यांना कुणी स्वतंत्र विचाराचे म्हणतच नाहीत ना ! जरा वेगळे स्वतंत्र विचार असणाऱ्यांनाच लोक खरे स्वतंत्र विचाराचे म्हणतात !

सरिता :- पण त्या वेगळ्या लोकांत तरी वेगळं काय असतं असा उलट माझा प्रश्न आहे.

रामदास : - उलट वगैरे नाही, नुसताच तुझा प्रश्न आहे.

सरिता :- ते ठीक आहे -- त्यातले काहीजण जरा सुधारणा - बिधारणा करतात इतकंच.

रामदास :- वेगळं काही नसतंच तर स्वतंत्र विचाराचे लोक झालेच नसते जगात ! निरनिराळे विचारवंत, सुधारक यांच्याबद्दल तुला आदर नाही ?

सरिता :- त्यांच्याबद्दल आदर बाळगा आणि आपल्या मुलीबद्दल मात्र डिफेन्सिव्ह राहा -- याला कसला विचार म्हणायचं ?

रामदास :- त्यांना समाज बदलायचा होता -- आपल्याला लग्न टिकवायचीच पध्दत टिकवायचीय !

सरिता :- ती आता आपण फार चिंता करून चालणार नाही -- काळानुरूप काय ते होत राहील ! आणि बघून-ठरवून लग्न करायला तयार आहे ती ! काही चिंतेचं कारण नाही.

रामदास :- तरीसुध्दा आपापल्या पध्दतीनं आपापलं बोलणं-वागणं चालूच असतं ना आपलं -- मला आपलं वाटतं की बोलून ठेवावं -- त्यांची मानसिक तयारी तरी राहील -- ( दारावरची बेल वाजते. सरिता जाऊन दार उघडते. ठकार येतात. ती दार लावून पुढे येते. ) -- या ठकार, या ! तोच विषय चालला होता ! या !

ठकार :- आलो जाऊन देवांकडे ! मला तर वाटतं की हे जमून जाईल !

रामदास :- बसा, बसा ! ठकार, मला तुम्हाला एक विचारायचं आहे --

ठकार :- विचारा ना । पण माझं मत म्हणाल तर हे देवांचं स्थळ बेस्ट आहे !

रामदास :- नाही, ते नाही, मी दुसरंच विचारणार होतो ! म्हणजे तुम्हालाच विचारायचं होतं !

ठकार :- तुम्ही माझ्याशीच बोलताय हे कळतंय मला -- तुम्हाला सांगू का -- हे असं लग्नं जमवणं -- मध्यस्थ वगैरे गोष्टींचा काळ आता थोडा राहिलाय -- हे काही लागणारच नाही आता यापुढे --

रामदास :- नाही, पण सध्या तरी तुम्ही मध्यस्थ आहातच नं -- तर मला असं विचारायचं होतं की -- तुम्हाला भीती नाही वाटत ?

ठकार :- कसली ?

रामदास :- हेच, आता तुम्ही दोन्ही बाजूंना सांगता की सगळं चांगलं आहे -- पण एखादं काहीतरी चांगलं नसलं तर ?

ठकार :- आता आपण मुद्दाम तर काही फसवाफसवी करत नाही -- एक आपला छंद म्हणून मी ही कामं करतो --

पण तरीही या बाबतीत तुम्हाला एक मजा सांगतो -- मी जेव्हा नव्यानंच ब्रँच मॅनेजर झालो होतो तेव्हाची गोष्ट आहे. दारिद्र्यरेषेखालच्या लोकांना आम्ही गाईम्हशींसाठी कर्ज द्यायचो -- तर ती जनावरं तिथल्यातिथं तपासून सर्टिफाय करायचं काम एका व्हेटरनरी डॉक्टरकडं होतं. ते कर्जदार सगळे हडकुळी -- तिथून थेट कत्तलखान्याकडेच न्यावीत अशी जनावरं  खरेदी करायचे म्हणजे साताठशेची म्हैस उदाहरणार्थ तीन हजाराला घ्यायचे आणि नंतर मग वरचे पैसे सगळे विक्रेत्याकडून परत घेऊन त्यांना वाटेल तसे -- म्हटलं तर दारू-मटणासाठी -- वापरायचे. ते असू दे -- तर तो व्हेटरनरी डॉक्टर ठरलेल्या पाच रुपयांऐवजी शंभर रुपये फी घेऊन ती जनावरं तीनतीन हजारांची आहेत असं सर्टिफाय करायचा ! मीही त्याला हेच विचारलं होतं -- तुला भीती नाही वाटत ?  तर तो काय म्हणाला, व्यवहार होऊन जाणार -- मला विचारणार कधी -- चारसहा महिन्यांनी किंवा जनावरं मेल्याचं कुठं पुढे येईल तेव्हा -- पण त्याला उत्तर आहे -- माल-न्यूट्रिशनमुळं म्हणजे कुपोषणामुळं असं होऊ शकतं -- अगदी सायंटिफिक उत्तर ! जनावरांना चारापाणी नीट नको ?-- असं त्याचं म्हणणं ! आता हे उदाहरण जरा चुकीचं दिलंय मी पण अर्थ घ्या समजून --

रामदास :- म्हणजे तो डॉक्टर एक प्रकारचा गुरूच म्हणायचा तुमचा ! असू दे ! पण तरीसुध्दा –

ठकार :- आणि तो तर ते फायद्यासाठी करायचा – इथे म्हणाल तर नुसता आनंद हाच माझा फायदा !

सरिता :- मी आलेच हं -- चहा टाकते -- ( जाते. )

रामदास :- एक हे तरी सांगावंच असं मला वाटतं -- आमची नम्रता जरा स्वतंत्र विचाराची आहे --

ठकार :- ( मोठ्यांदा हसून -- ) स्वतंत्र विचार ?! अहो, कर्जप्रकरणांमध्ये मी माझ्या वाट्याची लाच खात नव्हतो तर मला लोक स्वतंत्र विचाराचा म्हणायचे ! म्हणजे गंमत बघा, लाच खाऊ नये ही एके काळी सगळ्यांना मान्य अशी नीतीमत्ताच होती -- मग लाच खायचीच अशी पध्दत रूढ झाली -- त्यामुळं मग मी स्वतंत्र विचाराचा ठरलो ! माझे कसले हो स्वतंत्र विचार ! एक नंबरचा घाबरट मी ! पण मला भीती का वाटत नाही ते कळलं ना ! ?

रामदास :- म्हणजे हे काही सांगून ठेवायची आवश्यकता नाही ?

ठकार :- अहो कुठले स्वतंत्र विचार ? जरा आधुनिक विचाराचं असणं, जरा श्रध्दा--भक्तीबिक्ती कमी असणं किंवा जरा कम्युनिस्ट विचारसरणी असणं -- याच्या व्यतिरिक्त काय असणार आहे ? यातलं एखादं काही त्यांना अजिबातच चालणारं नसलं तर ते विचारून घेणं हे त्यांचंच काम आहे. ( क्षणभराने -- ) ज्याला फ्रीसेक्स म्हणतात तसलं काही नाही ना ?

रामदास :- अहो, छे हो ! तसलं काही नाही !

ठकार :- मग झालं तर ! बाकीच्या स्वतंत्र विचाराला कुणी भीत नाही ! फार तर वाद होतील, आहे काय !

रामदास :- मग ठीक आहे ! नको म्हणताय तर राहिलं !

ठकार :- हल्ली आता ते मानवी क्लोनचं एक सारखं चालू आहे विचारमंथन ! आता एखादा समजा म्हणत असेल की करावा मानवी क्लोन -- तर याला काय स्वतंत्र विचार म्हणायचं का ? आणि परवा असंही वाचलं की गर्भपात करावा की करू नये, माणसाला फाशी द्यावं की देऊ नये याबाबतचे माणसाचे विचारही त्याच्या जनुकनकाशावर अवलंबून असतात म्हणे ! आता म्हणणार याला  स्वतंत्र विचार ? !

रामदास :- आता मात्र मला एक उत्सुकताच तयार झालीय. तुमच्या मते स्वतंत्र विचार म्हणजे काय ?

ठकार :- मला खरं तर त्यातलं काही कळत नाही. आकडेमोडी करत आयुष्य गेलं माझं. पण एवढ्या या धडपडीच्या आणि वैतागाच्या जगामध्ये आणि आताच्या या जीवघेण्या स्पर्धेच्या जगामध्ये कसले आलेयत स्वतंत्र विचार ! एकमेकांपेक्षा वेगवेगळे विचार आणि वेगवेगळे स्वभाव तर असतातच !

प्रॉब्लेम्स निर्माण व्हायला तेवढं पुरेसं आहे ! प्रॉब्लेम्सशिवाय कुणाला जगताच येत नाही, म्हणून म्हणतोय !

रामदास :- सध्या माझ्या मनाला समाधान वाटायला हे बरं आहे, पण स्वतंत्र विचाराचं महत्त्वच नुसतं नव्हे, तर त्याची शक्यताच नाकारली जाणं हे माझ्या मनाला आतनं पटत नाहीय.

ठकार :- बरं, एक साधं बघा, वाईट वाटून घेऊ नका, पण मला सांगा, एवढं मोठं काही नावबीव झालंय का नम्रताचं -- तिच्या कुठल्यातरी विचारामुळं ? नाही ना, मग द्या सोडून ! ( सरिता चहा घेऊन येते. )

सरिता :- काय ठरलं मग ? सांगून ठेवायचं ?

ठकार :- छे छे ! उलट हास्यास्पद होईल ते ! स्वत:च्या मुलीला आपणच स्वतंत्र विचाराची म्हणणं ! नम्रता नम्र आहेच, आपणही नम्रच राहावं !

रामदास :- अहो मी काही ते भूषण म्हणून सांगत नव्हतो, एक भीतीचा मुद्दा म्हणून बोलत होतो !

ठकार :- तुम्ही सांगत होता की बोलत होता ते जाऊं द्या आता ! ते ठीक आहे. आता मी बोलू का जरा ?

सरिता :- अहो बोला नं, तेच तर खरं महत्त्वाचं आहे !

ठकार :- बघण्याच्या कार्यक्रमानंतर तुमचं जसं एक पॉझिटिव्हकडे झुकणारं मत आहे तसंच त्यांचंही आहे, हे माझ्या लक्षात आलं. आता फक्त त्यांचं एकच म्हणणं आहे की मुलगा आणि मुलगी स्वतंत्रपणे एकदा भेटू द्यात, बोलू द्यात, एकमेकांना समजून घेण्याचा त्यांचा त्यांचा प्रयत्न होऊन जाऊ द्यात आणि मग काय ते बोलू --

सरिता :- बरोबरच आहे हे -- हे व्हायलाच हवं --

रामदास :- म्हणजे एकमेकांचे विचारही कळतील !

ठकार :- कळू द्यात हो, त्यासाठीच तर असतं ना हे ! काही घाबरायचं कारण नाही ! वयाचा करिश्मा वेगळाच असतो !

रामदास :- या सगळ्यात नं आता, मीसुध्दा तुमच्याइतकाच अनुभवी असूनही, तुम्ही अनुभवी आणि मी एक बालक असं व्हायला लागलंय !

सरिता :- ते तुमच्या स्वतंत्र विचारामुळं ! किंवा खरं तर स्वतंत्र अविचारामुळं ! (बेल वाजते. सरिता दर उघडते. नम्रता येते. ) हं, ये बाई ! ऐक काय ठरलंय ते ! तू आणि प्रसादनं एकदा स्वतंत्रपणे भेटावं आणि एकमेकांशी बोलावं असं त्यांचं म्हणणं आहे --

नम्रता :- हं, ते ठीकच होईल --

ठकार :- तुझे बाबा घाबरतायत ना पण --

नम्रता :- का ?

ठकार :- त्यांचं म्हणणं तू स्वतंत्र विचाराची आहेस म्हणे ! तो प्रॉब्लेम वाटतोय त्यांना !

नम्रता :- मी ? ( इथे प्रकाश कमी होत जात दृश्य संपते. आता अमर, अकबर आणि अँथनी प्रवेश करतात. सिनेमातल्या गाण्याप्रमाणेच. )

अमर :- अम ऽ र

अकबर :- अकब ऽ र

अँथनी :- अँथनी ऽऽ ...( असे आणखी एकदा. )

अमर :- या नाटकातल्या इतर पात्रांसारखं आपलं नाही -- आपण पिक्चरमधली पात्रं आहोत –

अँथनी :- म्हणजे खोटी ! – तिथे उलट होतं – त्या सिनेमाचे दिग्दर्शक मनमोहन देसाई म्हणायचे की म्हणे माझ्या सिनेमाची कथा खोटी असते पण पात्रं खरी असतात !

अमर :- तोच खरेपणा इथेही ठेवू – खोटाखोटा --

अकबर :- तर तिथून डायरेक्ट आपण इथं आलो आहोत -- इथंही आपल्याला कामं आहेतच --

अँथनी : आपण यांच्याबरोबरच राहू -- हे वास्तवातले आणि आपण अवास्तव असलो तरी -- अलगतावाद नको --

अमर :- आपण वेगवेगळे असलो तरी एकच आहोत --

अकबर:- आपला वेगवेगळेपणा हीच आपली संस्कृती आहे --

अँथनी :- तरीही ' अनेकता में एकता ' हा नारा महत्त्वाचा आहे --

अकबर :- पण तरीही मनात एकमेकांबद्दल एक डाऊट हा असतोच --

अमर :- 'अनेकता में एकता ' हा नारा मला एकदाच शंभर टक्के पटला होता.

अँथनी :- कधी ?

अमर :- हे एका कोड्याचं उत्तर म्हणून समोर आलं तेव्हा !

अकबर :- कोडं ?

अमर :- एक चित्र दाखवून त्यांनी विचारलं होतं की हे काय आहे ? उत्तर होतं अनेक ' ता ' में एक ' ता ' !

( ता ता ता
ता ता <u>ता</u>
ता ता ता

-- असा एक बोर्ड घेऊन दोघेजण इकडून तिकडे जातात. )

अमर :- मला तर वाटतं की माणसाला अशा निरनिराळ्या धर्मांची गरजच नव्हती.

अँथनी :- मग आपला पिक्चर कसा आला असता ?

अकबर:- मनुष्यधर्म हाच खरा धर्म -- हे म्हणायची फॅशन जुनी झाली आता --

अँथनी :- धर्मसंघर्ष -- विचारसरणी संघर्ष --

अमर :- जातसंघर्ष, भाषासंघर्ष --

अकबर :- आणि मोस्ट मॉडर्न -- संस्कृतिसंघर्ष !

अँथनी :- हे ' मोस्ट मॉडर्न ' नाही -- ' पोस्ट मॉडर्न ' आहे !

अमर :- ' आफ्टर पोस्ट मॉडर्निझम ' नावाचं पुस्तकही आलंय ! शिवाय आणखी भेदक हवं असेल तर ' इल्युजन्स ऑफ पोस्टमॉडर्निझम ' म्हणजे ' आधुनिकोत्तराचे भ्रम ' -- हेही उपलब्ध आहे --

अकबर :- आता नुसतं पोस्ट पोस्ट पोस्ट पोस्ट करत बसावं लागेल -- पोस्ट पोस्ट मॉडर्निझम -- असं !

अँथनी :- आता आपलं काम काय याच्यात ?

अकबर:- अनहोनी को होनी करना !

अँथनी :- म्हणजे ?

अमर :- हे सगळे संघर्षांचे प्रश्न सोडवून दाखवायचे ?

अकबर :- म्हणजे सामाजिक बांधिलकीचंही जमून जाईल !

अँथनी :- मानवजातीतल्या एका छोट्या समूहाशी बांधिलकी असेल तरच त्याला सामाजिक बांधिलकी म्हणता येतं -- पूर्ण मानवजातीशी असणाऱ्या बांधिलकीला कुणी सामाजिक बांधिलकी म्हणत नाही.

अकबर:- म्हणजे सामाजिक बांधिलकींचेही संघर्ष --

अमर :- राष्ट्रीय बांधिलकींचे संघर्ष --

अँथनी :- हे सगळं ॲड होणार ! आपण इथून पळ काढू या -- आपल्याला पराभव पचवता येणार नाही -- आपण विजयाला चटावलेले आहोत -- या होनीची अनहोनी करणं आपल्याला कल्पनेतही शक्य होणार नाही -- ( नम्रता प्रवेश करते. )

नम्रता :- मी तुम्हाला एक प्रश्न विचारतेय -- जगातल्या सगळ्या धर्मांनी एकच अवघडपणा केला – कोणता ?

अमर :- कोणता ?

नम्रता :- सगळे धर्म सतत मानसिक भाषेत बोलत राहिले ! म्हणजे -- प्रेम, भीती, व्देष, हाव, हिंसकपणा, वगैरे.

अँथनी :- बरं, मग ?

नम्रता :- त्यामुळं गोंधळ वाढले ! बोलून संपणारच नाही असं झालं !

अँथनी :- पळून जायचा निर्णय आमचा आधीच झालेला आहे --

नम्रता :- ठीक आहे -- त्यासाठी शारीरिक पळायची काही आवश्यकता नाही -- ( घोषणा करत -- ) चला -- जनरल नॉलेजचा तास ! -- जनरल नॉलेज -- सामान्य ज्ञान ! -- चला चला -- ( इथे ते तिघे विद्यार्थी होतात -- ) आजचा विषय -- ( मोठ्यांदा -- ) ’ शेती ’-- ! हं, आता युनोच्या २००१ च्या अहवालातली मी काही माहिती सांगते -- जगाची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून २०५० सालापर्यंत अन्नधान्य, मासे तसेच गोड्या पाण्याच्या उपलब्ध साठ्यावर प्रचंड ताण येण्याची शक्यता आहे. सध्या जगाची एकूण लोकसंख्या सहा अब्ज दहा कोटी असून २०५० सालापर्यंत ती नऊ अब्ज तीस कोटी होईल. प्रचंड जंगलतोडीमुळे चक्रीवादळे, पूर, जमिनीची धूप होणे, वनस्पतींच्या प्रजाती नष्ट होणे आणि त्याचबरोबर उष्णकटिबंधात रोगराईत वाढ होणे -- यांची भीती आहे.-- हं, चला आता, पुढे ! हरितक्रांती म्हणजे काय ?

अमर :- अन्नधान्य उत्पादनातली क्रांती. ही मुख्यत: गहू आणि तांदूळ यातच झाली. भारताच्या ५०० जिल्हयांपैकी, पाटाचे पाणी उपलब्ध असलेल्यात ५० ते ७० जिल्ह्यांमध्येच ही झाली. जिराईत पिकांची उपेक्षा ही आपल्या शेतीविकासाची शोकांतिका आहे.

नम्रता :- एवढं सविस्तर नको. पुढे – धवल क्रांती ?

अकबर :- दुग्धोत्पादन.

नम्रता :- पीतक्रांती ?

अँथनी :- तेलबियांचे उत्पादन.

नम्रता :- वा, छान – आहे ना जग छान चालू ?

अमर :- होय. ओके. बास.

अकबर - सगळं आलं यात. सारखी क्रांत्यांची गरज असणं आणि सतत प्रश्न सोडवत राहणं !

नम्रता : - छान – ( जाते. )

अँथनी :- गाना !

तिघेही :- अनहोनी को होनी कर दे
होनी को अनहोनी
एक जगा जब जमा हो तीनो
अमर
अकबर
अँथनी ऽ ( आपले आपले नाव म्हणत निर्गमन करतात.

आता एका हॉटेलातले दृश्य. प्रसाद येतो. इकडे तिकडे बघतो. घड्याळात बघतो. बसतो. पुन्हा घड्याळात बघतो. क्षणभराने नम्रता येते. घड्याळात बघतच -- )

नम्रता :- मला वाटलं उशीर झाला की काय --

प्रसाद :- झालाच आहे थोडा -- पण ठीक आहे --

नम्रता :- ठीक असणं कधीही ठीकच !

प्रसाद :- जरा वेळानं सांगतो कॉफी -- चालेल नं --

नम्रता :- हो --

प्रसाद :- तुम्ही मानसशास्त्र घेऊन एम.ए. झालात नाही का -- सहज हं -- एक आपलं उत्सुकता म्हणून विचारतोय -- काय हो -- मन म्हणजे ?

नम्रता : नक्की माहीत नाही.

प्रसाद :- अरे ! रागबीग आला की काय ?

नम्रता :- नाही, त्याच्या वर्णनाबद्दल, व्याख्येबद्दल बरेच वाद -- मतमतांतरं आहेत --

प्रसाद :- अच्छा !

नम्रता :- परंतु, आपले विचार आणि भावना या काही स्नायूपेशींतून उगम पावतात आणि आपल्या शरीरातली रसायनं त्यांचं नियंत्रण करतात -- असं थोडक्यात म्हणता येईल. शरीराशिवाय मन अस्तित्वात असत नाही.

प्रसाद :- म्हणजे सशक्त विचारासाठी आधी सशक्त शरीर लागेल !

नम्रता :- सशक्त विचार म्हणजे काय, माहीत नाही. तुमच्या फील्डमध्ये इतके वाद नसतील. कारण क्लिक केलं की काय ते स्क्रीनवरच दाखवता येतं.

प्रसाद :- पण आधी तुम्ही, मग आम्ही ! मनच नसेल तर कुठला कॉंप्यूटर ! प्रोग्रॅम्स, गेम्स, चॅटिंग सगळं नंतर !

नम्रता :- तुम्ही चॅटिंग करता ?

प्रसाद :- हो, करतो कधीकधी – कधी कधी एक चावट गंमत म्हणूनही -- सारखं आपलं ’ ट्राय युवर लक एल्सव्हेअर ’ हेच समोर यायचं – शेवटी ऑट्रेलियातली एक बाई भेटली ! तिला वाटलं माझ्यात इंटरेस्ट ! बोलता बोलता उद्योगधंद्याचा विषय निघाला.

नम्रता :- मग ?

प्रसाद :- ती होती पोलीस ऑफिसर ! दचकलो, पण म्हटलं ग्रेट आहे. मी, म्हटलं एक संगणक शिक्षक आहे. तर ती मलाही ग्रेट म्हणाली. तुम्ही करता की नाही चॅटिंग ?

नम्रता :- क्वचित – तेही चावट नाही -- ( तो तिच्या पायाला पाय लावतो. ती लावू देते. आता मधूनमधून क्रिया - प्रतिक्रिया. )

प्रसाद :- तुमचं त्या क्लिंटन -- लुईन्स्की प्रकरणाबद्दल काय मत आहे ? आपल्याकडे असं सिध्द होऊ शकलं असतं ?

नम्रता :- कपडेच ठेवले होते म्हणतात नं तिनं तिचे ! सिध्द होऊ शकलं असतं पण मग त्या माणसाला इथं पुन्हा डोकं वर काढता नसतं आलं ! घरच्या लोकांनी आणि बाहेरच्या लोकांनी सगळ्यांनीच त्याला टाळलं असतं !

प्रसाद :- पण अमेरिकेत उलटं झालं ! खरे उदार लोक ! पण मग त्यामुळं भारतीयांनीही त्या राजबिंड्या प्रेसिडेंटचं दिलखुलास प्रचंड स्वागत केलं ! तुम्हाला ही विसंगती नाही वाटत ? भारतातली ?

नम्रता :- अमेरिकेच्या अंतर्गत प्रश्नांमध्ये भारत हस्तक्षेप करू इच्छित नाही हे लोकांनी दाखवून दिलं !

प्रसाद :- ( हसून -- ) रिअली अ गुड ज्योक ! हल्ली आपले आपण साथीदार निवडणं चालू असताना तुम्ही असं ठरवून लग्न का करताय ? ते सुध्दा तुम्ही देशस्थ ऋग्वेदी, आम्ही देशस्थ ऋग्वेदी -- असं ?

नम्रता :- हाच प्रश्न मीही तुम्हाला विचारू शकते !

प्रसाद :- मी काही खास असा स्वतंत्र विचाराचा वगैरे नाही -- आहे आपला --

नम्रता :- ऍडजस्टमेंटचे त्रास कमी व्हावे इतकंच हो ! पण तुम्ही ’ आहे आपला -- ’ कसे ? तुम्ही मराठीतले एक चांगले कथाकार आहात. मी काही कथा वाचल्यायत तुमच्या. आधुनिकोत्तर काळातल्या पिढीत तुमचं नाव आहे, हेही मला माहीत आहे.

प्रसाद :- थँक्यू !

नम्रता :- माणसानं आयुष्यात पैसा -- संपत्ती किती मिळवावी -- याबद्दल तुमचे काय विचार ?

प्रसाद :- जगण्यात पूर्ण सिक्युरिटी ही गोष्ट अशक्यच आहे. तरीही कंफरटेबली जगून काही रक्कम शिल्लक असावी असं मला वाटतं -- पैसा लागतोच --

नम्रता :- फक्त तो इतकाही नसावा की खूप मालमत्तेची देखभाल, दुरुस्त्या, निरनिराळी बिले भरणे, निरनिराळया ऑफिसांत चकरा मारणे आणि कोर्टकचेऱ्या यांत जगणं नष्ट होऊन जावं !

प्रसाद :- बेस्ट ! याच्याहून जास्त चांगलं या विषयावर मला काहीच बोलता येणार नाही ! बरं, ठीक आहे, तुमच्या इंटरेस्टचा एकच महत्त्वाचा असा  काही विषय आहे का ?

नम्रता :- आहे ना ! माणसाच्या सगळ्या संबंधांमध्ये संघर्ष का -- हिंसा का -- हे समजून घेण्याची मला अक्षरशः तळमळ आहे. मानसशास्त्रात याचं निराकरण नाही हे मला माहीत आहे. आणि सगळ्या धर्मांचा प्रॉब्लेम असा आहे की त्यांनी मनाच्याच क्षेत्रात सगळी चर्चा केली ! त्यामुळं नुसती विविधता आणि संघर्ष वाढले ! साध्या नात्यातल्या, मैत्रीतल्या संघर्षांतून मला असे प्रश्न पडायला लागले --

प्रसाद :- म्हणजे कृष्ण, खिस्त, गौतमबुध्द, महंमद, महावीर यांच्या मर्यादा सांगताय की काय तुम्ही ?

नम्रता :- आधी अर्थात् ते काय म्हणतायत तेच समजून घ्यावं लागेल -- ( तो आता तिचा हातच हातात घेतो. ती घेऊ देते. )

प्रसाद :- म्हणजे बाकी काही प्रॉब्लेम नाही !

नम्रता :- काहीच नाही ! ( हसतात. तो हात सोडतो. )

प्रसाद :- ( वेटरकडे पाहून -- ) भाईसाब, दो कॉफी ! ( क्षणभराने -- ) बाकी वडीलधाऱ्यांबद्दल आदर वगैरे विषयांवर काय मतं ?

नम्रता :- एक तर आदर म्हणजे भीती असू नये आणि दुसरं म्हणजे आदर बाळगणं म्हणजे त्यांची मतं आणि दृष्टिकोण आपण आत्मसात करणं नव्हे. ( क्षणभराने -- ) बरं, स्त्रीला बरोबरीचं स्थान देण्याबद्दल तुमची काय मतं ?

प्रसाद :- नो प्रॉब्लेम ! मला वाटतं आपण नुसतंच जनरल बोलतोय.

नम्रता :- माझ्या दृष्टीनं ते पुरेसं आहे.

प्रसाद :- मग माझ्याही दृष्टीनं. ( कॉफी येते. ) समजा आपलं लग्न झालं तर अमुक एक गोष्ट त्रासदायक वाटू शकेल असं काही ?

नम्रता :- नाही, तसं काहीच वाटत नाही मला. तुम्हाला ?

प्रसाद :- मलाही नाही ! ( तिच्याकडे एकटक बघत कॉफी पीत राहतो. काही क्षण ती लक्ष नसल्यासारखे करते, पण  नंतर -- )

नम्रता :- असं काय पाहताय ?-- ( तो सावरून काहीतरी उत्तर देत असताना प्रकाश मंद होत दृश्य संपते. पुढील

दृश्य हे पुन्हा समूहदृश्य आहे. अमर, अकबर, अँथनी येतात – गाणे म्हणत -- ' सिकंदर ने पोरस से की थी लडाई, जो की थी लडाई, तो मैं क्या करूँ ? ' या गाण्यावर जोरदार नाच करतात. नाच संपल्यावर नम्रता प्रवेश करते. )

नम्रता :- चला चला, प्रॉब्लेम्सची उजळणी -- प्रॉब्लेम्सची उजळणी ! राजकारणानं आपल्याला काय दिलं ?

अँथनी :- चेंगीजखान, स्टालिन, हिटलर आणि मुसोलिनी !

नम्रता : राष्ट्रवादानं आपल्याला काय दिलं ?

अकबर :- माणसामाणसांत विदीर्णता आणि संरक्षणाच्या नावाखाली शस्त्रास्त्रांवर अफाट खर्च ! अफाट खर्च आणि अफाट हिंसा !

नम्रता :- आणि निरनिराळ्या धर्मांनी -- धर्मांनी काय केलं ? आश्वासनं दिली एकात्मतेची, शांततेची, अहिंसेची आणि आनंदाची ! प्रत्यक्षात दिली फूट आणि दिले अगणित रक्तलांछित संघर्ष !

अमर :- रक्तलांछित संघर्ष !

नम्रता :- आता हे सगळे प्रश्न एकेक करून सोडवता येतील ? येतील का ?

अमर :- ( पुढे येऊन-- एका म्हाताऱ्याच्या आविर्भावात -- ) यात धर्मांचा काय दोष ? माणसांना धर्म समजले नसतील !

नम्रता :- त्यामुळं -- फूट आणि संघर्ष ! ( इथे ठकार प्रवेश करतात. )

ठकार :- अहो, मी ब्रँच मॅनेजर असताना एक नगरसेवक माझ्याशी तावातावानं भांडायला आला होता. मला म्हणाला की तुम्ही तुमचा ब्राम्हणी कावा वापरून आमच्यात फूट पाडताय. म्हटलं, ते कसं काय ? तर म्हणाला, तुम्ही हरिजनांची कर्जप्रकरणं जास्त करता, त्या मानानं मांगांची काहीच करत नाही. अरे बाबा, म्हटलं, एकदा महामंडळाकडून प्रकरणं आली की मग आम्ही त्यात पुन्हा जाती वगैरे बघत बसत नाही ! तिथूनच मांगांची प्रकरणं कमी येतात का ते बघ ! याच्यावर तो म्हणाला की म्हणे कालपरवा तुमच्याकडे आलेली चार प्रकरणं मांगांची आहेत, ती द्या करून ! ( इथे अमर, नम्रताकडे पाहात, मिष्किलपणे -- ' माँग के साथ तुम्हारा मैंने माँग लिया संसार ' -- हे गाणे सुरू करतो – मग सगळेच म्हणतात. आता रामदास संतांचे घर. ठकार लगबगीने येतात.)

ठकार :- काय आहेत का रामदासपंत संत ?

रामदास :- ( आतूनच -- ) आलो, आलो, बसा ! ( ठकार बसतात. रामदास आतून तांब्याभांडे घेऊन येतात. ठकार 'नको ' म्हणतात. )

ठकार :- झालं ना सगळं मनासारखं ? साखरपुडाही झाला ! काही प्रॉब्लेमच नाही --आता लौकरात लौकर मुहूर्त आणि कार्यालय यांचा ताळमेळ जमवा आणि द्या उडवून बार !

रामदास :- मग स्वतंत्र विचाराचा विचार सोडूनच देऊ म्हणताय ! ?

ठकार :- अहो, साधी गोष्ट आहे. त्यांची त्यांची बोलणीही झाली की नाही ? नम्रताचे विचार जर का एवढे स्वतंत्र असते -- त्यांना न झेपण्याइतके -- तर ते त्यांच्या लक्षात नसतं का आलं ?

रामदास :- कधी कधी फारच गंभीर असते हो ती ! अगदीच सीरीयस काहीतरी बोलते ! आपण ऐकून चाट पडावं असलं काहीतरी ! दुसरं सगळं चाललं असतं हो पण मुख्य काळजीचं कारण म्हणाल तर धर्म म्हणजे काय हेच समजून घ्यायचा प्रयत्न करते हो ती !

ठकार :- अहो मग चांगलं आहे की ! त्यामुळं तिच्याच कुटुंबाला पुण्य मिळेल ! आणि घरात बायका धार्मिक असलेलं कुणाला आवडत नाही ? धर्म, नीतीमत्ता, संस्कृती हे मुख्यत: बायकाच टिकवत असतात ! काय, एकटेच आहात काय घरात ?

रामदास :- नाही, नाही -- आज सुट्टीचा दिवस ! ही आणि नम्रता स्वयंपाकात आहेत. म्हटलं आता जरा जास्त लक्ष घाल स्वयंपाकात, बघून घे, नंतर उगीच प्रॉब्लेम नको ! एकच मुलगी म्हणून लाडावून ठेवलीय असं नको व्हायला !.

ठकार :- ते बरोबर आहे --

रामदास :- ती काय म्हणते की म्हणे एकेका माणसालाच किती प्रॉब्लेम्स असतात तर जगातल्या अब्जावधी लोकांचे मिळून किती होतील प्रॉब्लेम्स !? शिवाय डावपेच, युध्दं, दहशदवाद -- म्हणजे किती प्रॉब्लेम्स ! माणूस नीट जगूच शकणार नाही अशानं ! तर तिला असं वाटतं की एकच गुरुकिल्ली अशी सापडली पाहिजे की सगळे संघर्ष गळून पडतील !

ठकार :- आपल्याला काय करायचंय म्हणावं इतकं ? इतकी कोट्यवधी माणसं आहेत -- कुणी काही इतकं मनाला लावून घेतं का ?

रामदास :- अहो, ती म्हणते जगाचं सोडा, एक माणूस, ती स्वत: तरी कशी नीट जगू शकेल ? मन सारखं कुठल्या ना कुठल्या संघर्षात असताना ?

ठकार :- हे चुकीचं आहे तिचं ! इतकी कोट्यवधी माणसं नाही जगत ? आम्ही नाही जगत ? आणि तुम्ही ? मी सांगतो तिला, बोलवा बरं बाहेर !

रामदास :- ए नम्रता --

नम्रता :- ( आतूनच -- ) ओ S --

रामदास :- तू आणि ही बाहेर या बरं जरा वेळ -- हे ठकारकाका आलेत बघ -- त्यांना बोलायचंय तुझ्याशी --

नम्रता :- आले S -- ( क्षणभराने ती येते. नंतर तिची आई सरिता येते. )

ठकार :- नम्रता, मी तुला एकच विचारतो, तुला काय संत मीराबाई व्हायचंय का ? तिचा संसार कसा झाला माहीत आहे नं ?

नम्रता :- मला कुणी व्हायचं बियचं नाही काका, पण आपोआप घडेल ते घडेल, हे कसलं आयुष्य -- असं मला वाटतं. काहीही समजून घ्यायच्या सगळ्या गरजा ठार मारून इतकं कंटाळल्यासारखं नाइलाजाचं जगणं म्हणजे कसलं ते जगणं ? -- असं मला वाटतं.

ठकार :- म्हणजे आम्ही, हे, ते, सगळे असं जगतो, असं तुला वाटतं का ?

नम्रता :- हे जग -- जवळचं आणि लांबचंही -- इतकं भयानक का झालंय ? कुणा ठराविक माणसांमुळं का ? आणि याच्यावर कोण कसली कृती करू शकेल ?

ठकार :- कोणती कृती ?

नम्रता :- तोच तर शोध घ्यायला हवाय – माझ्या डोक्यात तरी ताण का असतात, असाही पडतो मला प्रश्न --

सरिता :- कसले ताण ? ! सध्या ती स्वयंपाक शिकतेय ते ठीक आहे. असं खूप काय काय कळावं असं माणसाला वाटत असतं. काळाच्या ओघात त्याला कळत जातं की काही कळायची गरजच नसते. आणि किरकोळ काही कळून उपयोगही नसतो त्याचा. आता हा एवढा दहशतवाद फोफावलाय तो मला काहीतरी कळून कसा काय थांबणाराय ? ज्यांच्या डोक्यांवर बॉम्ब फुटले ते मेले, ज्यांच्या डोक्यांवर अजून नाही फुटले ते जगताहेत , एवढंच आपण पाहायचं !

ठकार :- वा, वहिनी, याच्याहून थोडक्यात आणि याच्याहून करेक्ट असं मला तरी बोलता येणार नाही !

नम्रता :- भयानक वाटतं मला हे !

रामदास:- ते बरोबर आहे, पण करणार काय ?

सरिता :- आणि हे म्हणतात स्वतंत्र विचार ! हे ! काय करायचेत ! आपलं रोजचं जगणं महत्त्वाचं !

नम्रता :- हे बरोबर आहे आई तुझं ! रोजचं जगणं !

ठकार :- जाऊं द्या, द्या ते सगळं सोडून आणि पुढच्या तयारीला लागा -- संसाराच्या चार जबाबदाऱ्या पडल्या की माणूस आपोआप येतं वळणावर --

नम्रता :- काका पण माझा कुणाला काय त्रास आहे ? फक्त, आपल्या शत्रूंना आपण ठार मारत गेलो की आपले प्रश्न सुटत जातील असं जगभर सगळ्यांनाच वाटतंय हे मला दिसतं. मला हा मोठा प्रॉब्लेम वाटतो ! आणि त्याचा आणि माझ्या मनाचा काहीतरी संबंध असणार असं वाटतं --

ठकार :- हे असले प्रॉब्लेम्स अमेरिकेचे अध्यक्ष सोडवतील -- या असल्या प्रॉब्लेम्सशी आपला काय संबंध येणार आहे ? आणि आपली योग्यता तरी काय ? शक्ती किती ?

नम्रता :- हे प्रॉब्लेम्स दिसतात म्हणून मी काही रामनामाचा जप करत बसणार नाहीय काका ! माझी कर्तव्यं नीट पार पाडली जातीलच ! अथांग एकटेपणा डोक्यात भरून इतकी माणसं जगतात, त्यांची नाही तुम्हाला काळजी वाटत ! कारण ते तुम्हाला नॉर्मल वाटतं !

सरिता :- अगं, ते तेच म्हणतायत -- आपापली कर्तव्यं पार पाडली म्हणजे झालं, चला ! मी चहा टाकते हं, बसा -- ( जाते. )

नम्रता :- जाऊ काका मी आत ?

ठकार :- जा, जा -- ( ती जाते. ) ती बोलते अगदी परफेक्ट हो ! आणि बरोबरच आहे ! -- प्रत्येकाच्या डोक्यात एक स्वत:चंच जग चालू असतं तर तिच्या डोक्यात तिचं चाललं तर काय बिघडतंय ? करेक्ट आहे. आपल्याला भीती काय वाटते की ती वेडी होईल की काय किंवा संतबिंत होईल की काय ! आता तुमचं आडनावच संत आहे, त्याची एवढी काही भीती नसते हो, पण एकूण माणसांच्या गर्दीपासून फारच वेगळं पडायला नको, हो की नाही, डोन्ट वरी -- तसं काही होणार नाही. तसं काहीही होणार नाही. तुमची मुलगी म्हणून तुम्हाला वाटणार, पण, डोन्ट वरी.....( इथे हे दृश्य संपते. पुढील दृश्य सुरू होते ते 'अनहोनीकडे होनी कर दे ' हे गाणे म्हणत अमर, अकबर, अँथनी यांच्या प्रवेशाने. नंतर ओळीने उभे राहतात. )

अमर :- एका आकडेवारीप्रमाणे भारतातल्या प्रत्येक व्यक्तीचा सरासरी तीन परलिंगी व्यक्तींशी लैंगिक संबंध येतो.

अकबर :- हीच सरासरी अमेरिकेत नऊ आहे ! क्या लक है !

अँथनी :- आणखी एका आकडेवारीप्रमाणे भारतातल्या पंच्याहत्तर टक्के व्यक्ती या आयुष्यात एकाच परलिंगी व्यक्तीशी लैंगिक संबंध ठेवतात.

अमर :- म्हणजे उरलेल्या पंचवीस टक्के व्यक्तींची सरासरी नऊ ! अमेरिकेच्या तोडीस तोड ! नैतिकता गई भाडमे !

अकबर :- थांबा ! यहाँ मैं और कुछ कहना चाहता हूं ! एड्स् चा प्रसार रोखण्यासाठी वेश्या वस्त्यांवरच लक्ष केंद्रित करणं कसं महामूर्खपणाचं आहे हे सांगताना एका डॉक्टर महाशयांनी एका प्रतिष्ठित वर्तमानपत्रातल्या त्यांच्या लेखात असं म्हटलं आहे की वेडे आहात ! भारतातल्या, कल्पनेपेक्षा जास्त स्त्रियांचा स्वेच्छेनं किंवा इतर अनेक कारणांनी परपुरुषांशी संबंध येतो ! महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी चाळीस टक्के व्यक्तींना लैंगिक संबंधांचा अनुभव आहे ! आणि त्यांना हे माहीत आहे की ते काही पुढे एकमेकांचे जीवनसाथी होणार आहेत असं काही नाही !

अँथनी :- ही माहिती म्हणावी की प्रश्न ? ! जाऊं द्या ! या सगळ्या प्रकारात नम्रताचं लग्न आता जवळ आलं आहे. छान होईल लग्न ! त्या आनंदात पुढे --

अमर :- वास्तवाचे स्वरूप जाणून घेण्याची इच्छा हाच कला, तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांना एकत्र आणणारा दुवा आहे.

अँथनी :- ' स्वातंत्र्य ' म्हणजे राजकीय स्वातंत्र्य.

अकबर :- हक्क असल्याशिवाय न्यायालयाचा संबंध येत नाही.

अँथनी :- भिन्न मताचा आदर म्हणजे लोकशाही.

अमर :- मानवी मन स्वार्थाची क्षितिजे रुंदावण्यात गुरफटून रोगी बनते आहे.

अँथनी :- भेंड्या खेळताना, गाणं आठवण्यासारख्या क्षुल्लक कारणालाही अभूतपूर्व मानून ' बिग हॅण्डस् S ' किंवा 'वा SS व ' चे चीत्कार ऐकू येतात.

अमर :- जनुक चाचणीचा पुरावा ग्राह्य धरून कोर्टाने एका मुलीला आपल्या वडिलांचे ' अमुक ' नाव लावण्यास परवानगी दिली.

अकबर :- सध्या भारतात डिप्रेशनग्रस्त लोकांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या चाळीस टक्के आहे.

अमर :- डोळे उघडे ठेवून शिकता येत नाही.

अँथनी :- उपग्रहांव्दारे अक्षरश: माहितीचा धबधबा आपल्यावर कोसळतोय.

अमर :- चिनी, जपानी, भारतीय, इस्लामी आणि पाश्चात्य -- याच पाच जगातल्या मुख्य संस्कृती. काही संशोधक यात ऑर्थोडॉक्स रशियन संस्कृतीचाही समावेश करतात.

अँथनी :- आता हे थांबवू या -- या सगळ्या तुकड्यांचा काय उपयोग आहे ? आणि ही सगळी माहिती आहे की प्रश्न आहेत हे ?

अमर :- असं कसं ? मुख्य पाच संस्कृतींमध्ये आपली आहे की नाही, माहिती नको ?

अकबर :- शिवाय या सगळ्या तुकड्यांतून माणसाचं मन कसं काम करतं तेही दिसतं ना यार !

अँथनी :- तुम्हाला खूप माहिती आहे, कुठल्याही विषयावर तुम्ही बोलू शकता, मत देऊ शकता, सर्दी झाल्यावर काय करायचं, कॅन्सर झाल्यावर काय करायचं, कोर्टात आपली बाजू यशस्वी होण्यासाठी काय करायचं -- हे सगळं तुम्हाला माहिती पाहिजे, तरच तुम्ही एफिशियंटली जगू शकता -- ग्रेट !

अमर :- शिवाय तुम्ही दुसऱ्यांबद्दल सहानुभूती बाळगू शकता, दुसऱ्यांना मदत करण्याचं महत्त्व तुम्हाला कळतं. मग तुम्ही तुमच्या कामातही मोठे आणि माणूस म्हणूनही मोठे, असं होऊन जातं -- शिवाय पैशानं किंवा सत्तेनं किंवा दोन्हींनं मोठ्ठं होता आलं तर दुधात साखरच ! मग तर तुम्ही माणूस म्हणून आणखी खूप मोठ्ठे होता ! ग्रेट !

अकबर :- मग आतनं तुम्ही कितीही एकाकी असा, घाबरलेले असा, व्देषानं जळणारे असा की वैफल्यानं आक्रसणारे असा !

तिघेही :- खूप माहिती घ्या
खूप शिका
खूप यशस्वी व्हा
खूप श्रीमंत व्हा
खूप प्रसिध्द व्हा.

अमर :- दुसऱ्या लोकांच्या डोक्यांत तुमच्याशिवाय दुसरा विषय नाही इतके मोठ्ठे व्हा !

अँथनी :- मग बाकीचे लहानच राहणार का काय ?

अकबर :- म्हणजे बाकीच्यांचे मेंदू म्हणजे फक्त मोठ्यांच्या नावांची गोडाऊन्स ! ?

तिघेही :- अनहोनी को होनी कर दे ... मरू दे – चला -- ( इथे हे दृश्य संपते. यानंतरच्या दृश्यात दोन्हीकडची दृश्ये एकत्र चालू. रामदास संतांच्या घरातले आणि इकडे हे तिघे. रामदास, सरिता आणि नम्रता तिघे बसलेले. नम्रताला समजावणे चालू आहे. )

सरिता :- मुख्य ते सगळं तुला सांगून झालेलंच आहे. आता इतर सगळं सांगतेय ते लक्षात ठेव. वडीलधाऱ्यांना नमस्कार करत जा. एखाद्याला आवडत नसेल समजा नमस्कार केलेलं तरी केला म्हणून तो काही संतापत नाही पण याच्या उलट बाबतीतले वडीलधारे संतापू शकतात. असे लोक समजा क्रोध वाईट म्हणाले तरी हो म्हणत जा. कधीकधी क्रोध उपयोगी असतो असलं काही बोललीस तर ते संतापतील.

रामदास :- आपल्या भटजींचंच उदाहरण सांगतो तुला. माझा एक मित्र कम्युनिस्ट विचारसरणी पटणारा आहे. त्याच्याकडे सत्यनारायण सांगायला हे आले होते. इकडे संघाच्या विचारसरणीला हो हो करणारा माणूस तिकडे कम्युनिस्टालाही हो हो करत होता. मोटरसायकल, मोबाईल वापरतात, मुलगा अमेरिकेत पाठवलाय शिक्षणासाठी.

अँथनी :- अमर, ये देशस्थ देशस्थ क्या है देशस्थ देशस्थ ?

अमर :- ते ईलू ईलू इतकं सोपं नाहीय. पण आता जमानाच सगळा बदलणार आहे. हे देशस्थ न् ऋग्वेदी न् ब्राम्हणब्रिम्हण सगळं जाणार आहे. नो कुंडली आणि नो गुण जमवणे. आता जनुक-नकाशे जुळवावे लागणार आहेत. आवडीनिवडी, विचार जमणं आणि संतती उत्कृष्ट निपजणं हे जनुक-नकाशांवरून समजणार आहे !

अकबर :- ये जनुक जनुक क्या है ये जनुक जनुक ?

तिघेही :- जनुक माहीत नाही ? आश्चर्य आहे !

सरिता :- देवधर्म करत जा. त्यांचे काय कुळाचार असतील ते पाळ. निदान सुरुवातीला तरी पाळ. नंतर अंदाज घेऊन हळूहळू बदल कर. अंदाज विशेषत: सासूबाईंचा घ्यायचा. त्या जर समजूतदार असल्या तर लौकर सगळं जमून जाईल. आणि आपण समजूतदार आहोत असं सासूबाईंनी दाखवायची फॅशन आहे हल्ली. त्याचा तुला फायदा होईल. हळदीकुंकू, सत्यनारायण, मंगळागौरी -- असू दे. थोडा वेळ जाईल एवढंच, पण हा वेळ वाचवायला गेलीस तर खूप त्रासदायक पध्दतीनं तुझा याच्या तिप्पट वेळ वाया जाईल हे लक्षात घे.

रामदास :- वेळाचं म्हटलंस तर रोज सरासरी फार तर पंधरा मिनिटं एवढाच वेळ जाईल. पहिलं दान भुताला तसं हा वेळ देवाला समज ! अर्थात हे माझे विचार मी बोलत नाहीय -- तुला समजण्यासाठी बोलतोय !

अँथनी :- जनुकांची रचना म्हणजे क्रम कळला की त्यांचं कार्यही कळतं. पेशीतल्या अतिसूक्ष्म रंगगुणसूत्रांमध्ये त्या जीवाची इत्थंभूत माहिती रासायनिक -- सांकेतिक भाषेत परिबध्द असते. परिबध्द म्हणजे काय ते अमर सांगेल.

अमर :- परिबध्द म्हणजे बांधलेली, मांडलेली, ग्रथित केलेली.

सरिता :- पंजाबी ड्रेसला प्रॉब्लेम येणार नाही. पँटलाही येऊ नये. पण अंदाज घेऊन, विचारून काय ते ठरव.

रामदास :- मला वाटतं पण की माणसं तशी फ्री असतील -- उदार असतील.

सरिता :- म्हणजे त्यांना अहंकार नसतात असं नाही. ती माणसं दुखावली जात नाहीत असं नाही. दुखावली न जाणारी एकही व्यक्ती मी माझ्या आयुष्यात पाहिलेली नाही. आणि मुळात एक लक्षातच घे तू. पूर्णपणे चांगले -- स्मूथ असे संबंध कुठेही असू शकत नाहीत. होणाऱ्या शक्य त्या उपद्रवाचा अंदाज घेऊनच आपल्या विचाराप्रमाणे  बोलणं-वागणं हे नेहमीच करत राहावं लागतं. याला ढोंगही म्हणता येतं आणि शहाणपणाही म्हणता येतो. पण हा शहाणपणाच असतो हे लक्षात घे.

नम्रता :- माझी तुला माहिती आहे. मला काय प्रॉब्लेम्स येऊ शकतील असं तुला वाटतं तेवढंच सांग नं !

सरिता :- तेच चाललंय ! तेवढंच सांगतेय !

अमर :- अनेक विचारांचं -- रोगांचं मूळ आपल्या आनुवंशिकतेत आहे हे आता कळू लागलेलं आहे. त्यावरूनच रंगगुणसूत्रांतले दोष काढून टाकण्याची उपचारपध्दती आता उदय पावते आहे. यालाच जेनेटिक थेरपी म्हणतात.

रामदास :- मी तुला एक अगदी थोडक्यात सांगतो. नोकरीत कसं, नोकरी जाता कामा नये हे ध्येय समोर ठेवून आम्ही ॲडजस्टमेंन्ट्स् करत राहतो की नाही तसं धोरण ठेवायचं. तुटता कामा नये ! आता, कर्मधर्मसंयोगानं तुझं महत्त्व वाढलंच तर मग प्रश्नच नाही.

अँथनी :- सर्वसाधारणपणे नव्वद टक्के लोक एकाच बौध्दिक क्षमतेचे असतात. पाच टक्के तैलबुध्दीचे आणि पाच टक्के मंदबध्दीचे असतात, असं आधुनिक मानसशास्त्र मानतं. वंश, जात, धर्म, वर्ण, लिंग यांच्यावर बुध्दिमत्ता किंवा सर्जनशीलता अवलंबून नसते. आता याच्यापुढे तैलबुध्दीचं रहस्यच कळण्याची शक्यता आहे ! घरोघरी बुध्दिमान मुलं !

अकबर :- मग झाडू कोण मारणार ? हमाल कोण होणार ? कारकून कोण होणार ?

सरिता :- आणि आता एक आणखी एक मुख्य. प्रसाद लेखक-बिखक आहे. या लोकांचं लिहिणं-बोलणं खूप उदार असू शकतं पण त्यांना इतरांपेक्षा फार वेगळं समजायचं कारण नाही. मानवी संबंधांमधले काही गुंते यांना दिसत -- जाणवत असतील इतकंच ! त्यामुळं उदारपणा सगळा खरा धरून चालू नकोस !

अमर :- माणसाच्या पेशींत ऑन्कोजीन्स असतील तरच कॅन्सर होतो असं दिसून आलंय. जन्माला आलेल्या किंवा येणाऱ्या बालकांत ऑन्कोजीन्स असतील तर ' जिनोम ' उपचाराने ते नष्ट करून कॅन्सरचं उच्चाटनच करता येईल असा शास्त्रज्ञांना विश्वास वाटतो. जल-वायूप्रदूषणामुळे होणारे आजार सोडले तर बाकीचे आजार -- रोग नष्टच करता येतील अशी शक्यता आता समोर आहे.

रामदास :- ज्याच्यातून तुझ्यासाठी दु:ख निर्माण होईल असं काही करू नकोस, कारण मग ते आम्हालाही दु:खाचंच होईल -- बास !

अकबर :- म्हणजे मग आता असं पण होईल का काय की तुमचा पोरगा किंवा पोरगी शास्त्रज्ञ व्हायला पाहिजे की कलावंत की डॉक्टर की इंजिनियर -- हे पण ठरवता येईल की काय ?

अँथनी :- हे एकवेळ येईना का ठरवायला पण मला दुसरीच भीती आहे.

अकबर :- कुठली, कुठली ?

अँथनी :- होणारं मूल कोणत्या विचारसरणीचं होईल हे ठरवता आलं तर ?। नाहीतरी मनाचा सगळा पाया शारीरिकच आहे !

अमर :- मला वाटतं मग विचारसरणीचं महत्त्वच कमी होईल ! आता कसं, मी स्वत: विचार करून, पारखून माझी विचारसरणी ठरवलीय असं माणूस समजतो ! त्याला तो अभिमान असतो ! विचारसरणी कुठली का असेना !

अकबर :- ते ठीक आहे, पण आरएसएस वाले आपल्या पोरांना आरएसएस छाप करायला लागले आणि तसंच कम्युनिस्ट करायला लागले तर ? सध्याही अर्थात तसे प्रयत्न होत असतातच म्हणा !

अँथनी :- हिंदू, मुसलमान किंवा खिश्चन कुठलाही धर्म असो, त्यांना स्वप्नं पडतात की पूर्ण मानवजात आपल्या धर्माची झालीय -- आपल्या धर्माचं महत्त्व पटल्यामुळं ! तशीच स्वप्नं निरनिराळ्या विचारसरणीवाल्यांनाही पडत असतात ! या ना त्या प्रकारे माणसाला आपला घोळका मोठा करायचा

असतो ! आपलंच बरोबर वाटत असल्यामुळं, सुरक्षित वाटण्यासाठी ! – हे अर्थात मी इथे फक्त मित्रामित्रांत बोलतोय – धर्मप्रसाराचा मला कंटाळा आहे –

अकबर :- च्यायला मग तर खरं काय ओरिजिनल हे कळणारच नाही – हे जे जग दिसतंय ते की नंतर येणारं ?

अमर : - म्हणजे आपण मूळ सिनेमातले ते खरे की या नाटकातले खोटे म्हणजेच खरे ?

सरिता :- आणि आता एकच सांगते -- तुझ्या डोक्यात तू अमूक एक विचार करू नकोस असं काही मी तुला सांगत नाही -- कारण तू ते ऐकणार नाहीस -- पण ते सगळे विचार बाहेर बोलायची, आपल्या वागण्यातनं व्यक्त करायची काही आवश्यकता नाही – सगळ्याच बाबतीत तुझे सगळ्यांशीच मतभेद व्हायला लागले तर तुला तिकडे कुणी स्वतंत्र विचाराची म्हणणार नाहीत. विचित्र, तिरसट म्हणतील !

रामदास :- इतकं भिऊनही राहू नकोस -- बॅलन्स्ड राहा -- लोकही हल्ली मतभेद मान्य करतात -- सारखं कुठे डोकेफोड करणार -- हेही असतंच !

अमर :- आता इकडं अशक्य व्हायला लागलं -- आता थोडा वेळ प्रत्यक्ष जगण्याकडे पळू -- चला SS
अनहोनी को होनी कर दे
होनी को अनहोनी
एक जगा जब जमा हो तीनो
अमर, अकबर, अँथनी SS...

( हे म्हणत जातात... तिकडे संतांच्या घरातले दृश्यही प्रकाश मंद मंद होत संपते. अंधारात ' तदेव लग्नं ....' होते. ताशा -- सनई. काही क्षण चालू राहते. नंतर जे दृश्य उजळते ते देवांचे घर. श्री. व सौ. देव उभे -- नव्या कपड्यांत. बाहेर फटाक्यांची प्रचंड माळ वाजत राहते. झाडे -- त्यांचा प्रकाश. थोडी रोषणाईही दिसावी. काही क्षणांनी प्रसाद आणि नम्रता दारात येतात. त्या दोघांना ओवाळले जाते. उंबरठ्यावरचे माप सांडून नम्रता सुहास्यवदनाने पहिले पाऊल आत ठेवते. सगळे टाळ्या वाजवतात. ते दृश्य फ्रीझ...अचानक अमर, अकबर, अँथनी प्रवेश करतात. अमर एका उंचवट्यावर उभा राहतो.)

अमर :- मला एक डाऊट आहे -- ती अजून शोधात आहे, विचारात आहे असं दाखवतेय पण तिला काहीतरी कळलेलं आहे – एखाद्या दिवशी ती एकदम काही वेगळंच बोलेल –

अकबर :- आपल्या मनातलं पाप काढून टाकायला तिला जमलं असेल – हाच तर असतो मुख्य जिहाद –

अमर :- आमचे तुकारामबुवा याला म्हणतात, ' रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग ' – आणि हे युद्ध नुसतं आपल्याच डोक्यातलं कसं असेल ? बाहेरचं जग आणि आपण यांतलंही असणारच ना ! तेही आतलंच तर असणार युद्ध !

अँथनी :- आमच्याकडे कबूल करणं म्हणजेच ते पाप टाकून देणं – आतलं युद्धच टाकून देणं --

अमर : - पण ती तर म्हणते, हे सगळं मानसिक आहे – बोलेल तेवढं थोडंच – नुसताच काथ्याकूट !

अकबर :- फिर दूसरा और क्या हो भी क्या सकता है ? असूच काय असू शकेल दुसरं काही ?
(ते तिघे निघून जातात. समोर फ्रीझ दृश्य तसेच .... पडदा पडत जातो ...)

**-- अंक पहिला समाप्त --**

**-- अंक दुसरा --**

( अमर येतो. )

अमर :- तर असूच काय शकेल दुसरं काही ? शास्त्रीय शोधांनी तर बदलतच जाईल वास्तव – सध्या तर मादक द्रव्यांनीही बदलतंय –एकाला हवी होती हेरॉईनची माहिती – ती दिली --

आपण खसखस वापरतो ना त्या खसखशीच्या झाडाला जी बोंडं येतात त्यांच्यावर ब्लेडनं चिरे काढत जातात, त्यातून निघणारा गुलाबी चीक म्हणजे अफू. हा एक नैसर्गिक अंमली पदार्थ आहे. याच्यातच मॉरफिन नामक एक द्रव्य असतं -- त्याच्यावर रासायनिक प्रक्रिया करून तयार केलेलं अधिक प्रभावी अंमली द्रव्य म्हणजेच हेरॉईन. कळलं ? आणि यालाच गर्द, ब्राऊन शुगर, स्मॅक हीही नावं आहेत. -- मी नाही रे बाबा त्यातला ! -- तसं तर आपल्याला हे पण माहिती आहे की कसल्या प्रकारच्या पोरी कुठे मिळतात, त्यांचे रेट काय, याची माहिती कुठून काढायची ! तो चकित झाला ! म्हटलं, माहिती पाहिजे रे ! तर पुढं त्यानं मुख्य प्रश्न विचारला ! चारचौघात त्याच्या एका मित्रानं त्याला विचारलं होतं -- की बाईचा मूत्रमार्ग कुठं असतो आणि योनी म्हणतात ती कुठं असते, सांग म्हणे ! तो खजील झाला – नाही सांगता आलं -- त्याला म्हटलं, आता तुझे तू घे कष्ट जरा शोधायचे – साधं शरीरशास्त्राचं पुस्तक बघ ना एखादं --

( आता देवांचे घर. घरातली चार माणसे म्हणजे विष्णू देव. प्रसाद, नम्रता आणि मीना आणि यांच्याबरोबरच श्री. ठकारही टीव्ही बघत बसलेत. )

ठकार :- रिअली, चॅलेंजिंग जॉब ! मी आपला सहज म्हणून आलो तर मला तुमचाच ( देवांना -- ) कार्यक्रम बघायला मिळतोय ! ग्रेट !

देव :- तुम्हाला डायरेक्ट कामच दिसतंय, पण तो काळ, त्या काळातल्या स्टाईल्स, वातावरण -- हे सगळं अभ्यासून ठरवावं लागतं, हे काम नेमकं कसं करायचं ते !

ठकार :- अगदी हुबेहूब, ओरिजनलच वाटतं ! ( प्रसाद ’ जरा बोलू नका ’ असा हात करतो. क्षणभराने तोच बोलतो. )

प्रसाद :- या क्षेत्रात बाबांचं नाव आहे ते उगीच नाही ! कुठल्याही जुन्या वास्तूंचं -- मंदिरांचं, लेण्यांचं जीर्णोध्दाराचं किंवा पुनरुज्जीवनाचं काम म्हटलं की इकडेच येतात लोक !

मीना :- खूप पुरस्कार मिळालेत, मोठमोठ्या लोकांनी कौतुकं केलीयत !

देव :- पैसा तर मिळतोच पण शिवाय सांस्कृतिक काम केल्याचं समाधान ! आपण म्हणजे कोण, तर ही आपली संस्कृती ! ही वगळा, वुई आर झीरो ! ( कार्यक्रम संपतो. ठकार टाळ्या वाजवतात. )

ठकार :- मी ऐकून होतो पण आज पहिल्यांदा पाहिलं ! अभिनंदन ! ( देवांशी शेकहँड करतात. )

प्रसाद :- ( नम्रता गप्प आहे हे पाहून --) नम्रता मॅडम गप्पशा ? कसा वाटला कार्यक्रम ?

नम्रता :- नाही, कार्यक्रम छान होता --

प्रसाद :- ’ पण ’ -- पण काय ?

नम्रता :- नाही, या सगळ्या गोष्टींचं नेमकं काय होतं आपल्या आयुष्यात याचा विचार करत होते --

देव :- काय होतं म्हणजे ? इट इज अवर कल्चर ! वुई मस्ट कीप इट अलाइव्ह ! मेंटेन इट, नर्चर इट, बी प्राऊड अबाउट इट ! यात विचार करण्यासारखं काय आहे ! इट इज अवर हेरिटेज !

नम्रता :- नाही, कल्चर वगैरेबद्दल काही दुमत नाही, पण म्हणजे काय, आता ही जुनी पडझड झालेली लेणी तुम्ही

दुरुस्त केलीत ! आता यांचं किंवा एकूणच या लेण्यांचं काय घडत असतं आपल्या आयुष्यात ?

देव :- महाभारताचं काय घडत असतं, रामायणाचं काय घडत असतं, भगवद्गीतेचं काय घडत असतं, किल्ले, म्युझियम्स, आपला इतिहास -- काय घडत असतं यांचं आपल्या आयुष्यात ?। पोरकट प्रश्न आहे ! सर्वश्रेष्ठ आहे आपली संस्कृती !

नम्रता : - आता शास्त्राच्या प्रगतीनं मनंच बदलतील – मग हे हेरिटेज असंच दिसेल ?

ठकार :- बरं विष्णुपंत, मी निघतो ! आधीच उशीर झालाय ! पुन्हा येईन !

देव : - थांबा हो दोन मिनिटं !

मीना : - परदेशातल्या म्हणजे अनिवासी भारतीयांचा काय प्रश्न झालाय वाचलास का ? रामायण, महाभारत, अकबर-बिरबलाच्या गोष्टी यांच्या सीडी प्रचंड खपतायत तिकडे ! त्यांच्या मुलांसाठी ! ती मुलं आपल्याच संस्कृतीची राहिली पाहिजेत याला इतकं महत्त्व देतात ते लोक ! आणि सगळे एकापेक्षा एक ब्रिलियंट असतात ते ! नुसते बीए.एमए.नसतात ! सर्वश्रेष्ठ आहेच आपली संस्कृती !

नम्रता : - नीतीकल्पनांबद्दल बर्ट्रांड रसेल म्हणाला होता की त्यांची अमुक एक रचना सर्वश्रेष्ठ असं काही नसतं कारण अमुक एक पध्दत सर्वात जास्त श्रेयस्कर किंवा हितकारक असं काही कुठं सिध्द होऊ शकलेलं नाहीय ! तसंच अमुक एक संस्कृती सर्वश्रेष्ठ असं काही नाही !

मीना : - मुळात मोठ्यांशी वाद घालणं ही आपली संस्कृती नाही ! मला हे अजिबात आवडत नाही !

प्रसाद : - अॅकॅडेमिक मतभेद गं आई ! त्याला असं कशाला रूप देतेयस !

ठकार : - बरं, मी निघतो आता ! द्या परवानगी !

देव :- काम नव्हतं ना काही ?

ठकार :- नाही, नाही, सहज आलो होतो --

नम्रता :- काका, मला ' पोरकट ' म्हटलेलं ऐकलंत पण माझं म्हणणं न ऐकताच चाललायत !

ठकार :- अगं, चालू दे तुमचं अॅकॅडेमिक डिस्कशन ! पुन्हा येईन तेव्हा सांग मला ! चला ! बरं, प्रसाद, बरं मीनाताई ! येतो. ( सगळे उठतात. ते जातात. )

देव :- माणसाचा चांगुलपणा जो असतो ना तो सगळा संस्कृतीतूनच येतो --जगभर मान्य आहे हे सगळ्यांना --

नम्रता :- तरीही अमुक एक संस्कृती अधिक हितकारक किंवा सर्वश्रेष्ठ आहे, असं काही नाही.

देव :- अरे हो, पण हे लागेलच ना ! हे सगळे सांस्कृतिक परिणाम वगळले तर राहील काय मग माणसात ? संस्कृतीतूनच येतो चांगुलपणा -- माणसाचा --

नम्रता :- धर्मांच्या बाबतीतही माणसाला असंच वाटत आलेलं आहे पण धर्म सगळे विषारी झालेले आहेत हे आता डोळे उघडून पाह्यला हवं. आणि धर्म हा संस्कृतीचाच भाग असतो !

देव :- शनिवार वाड्यासाठी नुक्तेच सरकारनं दोन सव्वादोन कोटी रुपये खर्च केले, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन अशा कामांसाठी दर वर्षी दहा कोटी रुपये देणार आहे -- हे सगळे वेडे !

नम्रता :- मुलांना ट्रिपला न्यायला उपयोग आहे, दिव्यांचा खेळ दाखवता येतो -- हे सगळं ठीक आहे, पण आपण या सगळ्या गोष्टींचं विष केलेलं आहे याबद्दल मला शंका नाही.

देव :- म्हणजे तालिबान्यांनी बुध्दमूर्ती फोडून नष्ट केल्या हे बरंच झालं म्हणजे !? नष्टच करावं सगळं !

नम्रता :- मुद्दाम नष्ट करावं असं माझं म्हणणं नाही पण त्याचबरोबर खूपच मोठी रक्कम लागणार आहे हे लक्षात

घ्या ! रामकृष्णही आले-गेले, बुध्दही आले-गेले, सगळंच नाशवंत आहे ! पण आपण जतन करायचं महत्त्व माजवतोय । आणि यातच त्यांच्या नाशाची बीजंही आहेत ! कुठल्याही संस्कृतीला टिकून राह्यलाही आर्थिक शक्ती आणि शस्त्रास्त्रांची शक्ती या गोष्टी लागणार आहेत ! संस्कृतीतून भिनणाऱ्या अस्मितेमुळंच आपण एकमेकांचे सांस्कृतिक ठेवे नष्ट करणार आहोत ! त्यामुळं बंदोबस्तासाठी लागणारा खर्चही यापुढे हिशोबात धरायला नको ? म्हणजे एकूणात शेवटी नाशाचीच दिशा !

मीना :- आमच्या गावच्या देवीच्या मंदिराच्या जीर्णोध्दारासाठी आपण किती दिले माहिती आहे ? पंचवीस हजार ! शिवाय काम होईपर्यंत यांच्या अनेक चकरा झाल्या त्या वेगळ्या !

प्रसाद :- नम्रता, तू एक्स्ट्रीम काहीतरी बोलतेयस -- याच्यात मतभेद आणि चर्चेचाही प्रश्न येणार नाही -- दुर्लक्ष केलं जाईल तुझ्याकडे --

देव :- पडलं तर पडू दे म्हणायचं ! आणि धर्म, संस्कृती हे सगळं जर विषारी झालंय तर नेऊन बुडवायचं कुठं हे सगळं ? निराशावाद नुसता !

नम्रता :- माणसामाणसांत फूट पाडणं, दुरावा तयार करणं आणि शेवटी संघर्ष वाढवणं यांखेरीज या गोष्टींचं काहीही कार्य नाही ! मला तरी हे स्पष्ट दिसतं ! आणि आणखी एक महत्त्वाचं कार्य, सांगांयचंच झालं तर -- ते म्हणजे परकीय चलन मिळवणं -- परदेशी प्रवाशांकडून ! तेही लोक भ्रमात असतात ! त्यांना वाटतं त्यांच्या जगण्याला समृध्दी येते, असं बघत फिरून !

प्रसाद :- समृध्दी येत नाही ? आणि आपले लोकही ही एवढी अत्युच्च दर्जाची कला पाहून जातात त्याचं काहीच घडत नसेल ? ( इकडच्या दृश्यावरचा प्रकाश मंद होतो आणि दृश्य संपते. दुसरीकडे अमर, अकबर, अँथनी येतात. )

अमर : या जगप्रसिध्द अजंठा केव्हज ! पटपट बघायचं ! एक वाजायच्या आत पहिल्या बारा गुंफा बघून व्हायला हव्यात ! एक वाजता जेवण ! मग चारपर्यंत बाकीच्या बघून साडेचारला निघायचं आहे !

अकबर :- वेळा चुकवायच्या नाहीत !

अँथनी :- तुमच्या जीवनात आज ही एक महत्त्वाची सांस्कृतिक घटना घडतेय हे लक्षात घ्या ! ( पुढील आवाज -- 'आयला काय छान !', 'काय रंग ! त्या काळातले !', ' ग्रेट ! ', ' खरंच केवढं काम करून ठेवलंय ! ', 'खरंच अभिमानास्पद ! ', 'चला, चला, पुढे चला !' पुन्हा - 'काय छान !', 'ग्रेट !', 'रिअली !', ' चला, चला, पुढे चला !' पुन्हा -- ' वाह !', 'अप्रतिम !', 'चला, चला, पुढे चला !' मग -- )

अँथनी : - ( एकाची नक्कल करत -- ) या सगळ्यात ना मला ते हे फार आवडलं -- असं साईडनं लाईट मारला की गळ्यातल्या माळेचे मणी चमचमतात बघ ! अगदी खरे वाटतात ! ती नुसती रंगांची करामत आहे हं ! चित्रातले मणी आहेत ते ! मिरॅक्युलस ! त्या काळात !

अमर :- चला, चला, असे बोलत उभे राहू नका -- पटापट बघून संपवा. चला -- अजून खूप आहे -- ( गर्दी पुढे जाते. )

अकबर :- अमर, पण बारकाईनं बघणारेसुद्धा काही थोडे तरी असतील ! कुणीच नसेल असं तर होणार नाही !

अँथनी :- असतील तर ! आणि काही ना काही परिणाम तर होणारच --

अकबर :- पण इतके धर्म, इतके तत्त्वज्ञ, इतके कलाकार, इतका प्रचंड सांस्कृतिक ठेवा हे सगळं निर्माण होऊनही माणूस असा का राहिलाय मग ? जास्त जास्त बिघडतच का चाललाय ? दु:खी आणि हिंसक का होत चाललाय ? एका सामूहिक आत्महत्येच्या दिशेनं का सुसाट धावत सुटला आहे तो ? ( क्षणभराने -- ) हे फक्त माझ्या मनातले आहेत विचार – बाहेर मी हे कधीच नाही बोलत – ते जाऊ दे – गाणं म्हणू –

म्हणा -- ' देख तेरे संसारकी हालत क्या हो गई भगवान, कितना बदल गया इन्सान ' हे गाणे एंजॉय करत, नाच करत म्हणतात.)

अमर :- या गाण्याचा असा उपयोग आजपर्यंत हजारो वेळा झालेला आहे ! बाकीचं सगळं मरत जातं, बोंबलत जातं आणि हे गाणं त्यामुळं ' एव्हरफ्रेश ' राहतं !

नम्रता : - ( प्रवेशून -- ) हेमाडपंथी शैलीतल्या पुरातन मंदिरांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार आहे.

अमर : - राजाराम महाराजांच्या, सिंहगडावरील समाधीच्या दुरवस्थेकडे लक्ष द्यायची गरज आहे.

नम्रता : - भारतात ३५९३ ऐतिहासिक वास्तू या राष्ट्रीय महत्त्वाच्या वास्तू म्हणून पुरातत्त्व विभागाने जाहीर केल्या आहेत.

अमर : - त्यातल्या १६ वास्तूंचा युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश केला आहे.

नम्रता : - भारताचा आकार इंग्लंडच्या चौदापट आहे, त्या तुलनेनं पाहिलं तर भारतात सत्तर लाख सांस्कृतिक जागा आणि सव्वादोन लाख स्मारकं यांचं जतन व्हायला हवं ! ते नाहीय म्हणजे, एक प्रकारे, खरं जगच कमी पडतंय – आपलं वास्तव नीट वाढवण्यात कमी पडतोय आपण --

अँथनी : - ताजमहालाच्या सुरक्षा व्यवस्थेत वाढ करतायत !

अकबर : - सुधारणावादी म्हणतायत की या सर्वांचा उपयोग काय ? यावर इतका पैसा का खर्च करायचा ?

अमर : - ( राजाप्रमाणे -- ) कोण आहे रे तिकडे ! – ' कोण आहे – कोण आहे -- ' ( असे म्हणत जातो. )

नम्रता : - प्रचंड प्रमाणात झालेल्या भूकंपांमुळेच मानवी इतिहासात अनेक संस्कृतींचा विध्वंस झाला असल्याचा निष्कर्ष सॅनफ्रॅन्सिस्को इथल्या शास्त्रज्ञांनी काढला आहे ! ( सगळे जातात -- इकडे संतांच्या घरात रामदास. )

रामदास : - ( फोन फिरवतात. फोन लागल्यावर -- इकडे सौ.देव फोन घेतात. ) हॅलो --

मीना : - हॅलो --

रामदास : - हं -- नमस्कार ! मी नम्रताचे बाबा बोलतोय ! आहे का नम्रता ?

मीना : - नमस्कार ! -- आहे ना, तुमची शहाणी मुलगी !

रामदास : - अहो, म्हणजे --

मीना : - नम्रता ऽऽ ( ती येते. ) फोन -- ( तिच्या हातात फोन देऊन जातात. )

नम्रता :- हं, मी नम्रता बोलतेय --

रामदास :- हं, मी बाबा बोलतोय ! -- अगं, काय ऐकतोय मी हे ? असं बोललीस तू ? एवढं काय महत्त्वाचं होतं त्यात ? आपली मतं बोललीच गेली पाहिजेत का ?

नम्रता :- बाबा, मला ज्या गोष्टी समजून घ्यायची तळमळ होती, ध्यास होता ते सगळं लक्षात आल्यावर आता असं झालंय की मला ते सगळ्यांना सांगावंच लागणार आहे. कुणीतरी चिडतील, संतापतील, किंवा आपली चेष्टा करतील, टर उडवतील या भीतीनं गप्प बसणं म्हणजे फार मोठा गुन्हा होईल तो माझा ! त्यासाठी -- ते बोलता येण्यासाठी -- जरा वातावरण निर्मिती लागेलच .

रामदास :- असं काय आहे एवढं ? ' गुन्हा ' होईल, असं म्हणण्याएवढं ?

नम्रता :- ते आता फोनवर नको, भेटल्यावर बोलू ! तुम्ही काळजी करू नका ! ठीक आहात नं ?

रामदास :- प्रसाद काय म्हणतोय ?

नम्रता :- तोही तुमच्यासारखंच म्हणतोय, पण ठीक आहे सगळं !

रामदास :- नीट राहा ! प्रॉब्लेम करू नकोस !

नम्रता :- हो, हो.

रामदास :- ठीक आहे, ठेवतो मग --

नम्रता :- हं, ठेवा -- ( ते फोन ठेवतात. तीही ठेवते. ) ठकारकाकांचं काम असणार ! ( इकडचे दृश्य संपते. विंगेतून अकबर नम्रताला घेऊन येतो. )

अकबर :- हं, नम्रता, इकडे ये, माझं एक काम आहे तुझ्याकडे --

नम्रता :- हं, बोल --

अकबर :- हे कागद घे आणि माझं सगळं पाठ झालंय की नाही बघत जा -- कुठूनही सुरुवात कर -- फक्त एक लक्षात घे -- १२०६ -- महंमद घोरीचा मृत्यू इथून सुरुवात करू नकोस --

नम्रता :- का ?

अकबर :- कारण १२०६ समोर त्या कागदावर एक काळा ठिपका आहे -- कुठूनही सुरुवात कर म्हटलं की तिथूनच सुरुवात करतात सगळे ! तिथंच लक्ष जातं ना !

नम्रता :- हं, हं ! बरं ! १३४७ ?

अकबर :- दक्षिण भारतात बहामनी राज्याची स्थापना.

नम्रता :- १३५८ ?

अकबर :- तैमूरलंगाची दिल्लीवर स्वारी.

नम्रता :- बरं, १६०० ?

अकबर :- ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना.

नम्रता :- १६८० ?

अकबर :- शिवाजी महाराजांचा मृत्यू.

नम्रजा :- १७०७ ?

अकबर :- औरंगजेबाचा मृत्यू.

नम्रता :- १८१८ ?

अकबर :- पेशवाईचा अंत.

नम्रता :- बरं, १९५२ ?

अकबर :- पहिल्या सार्वत्रिक निवडणुका.

नम्रता :- १९५६ ?

अकबर :- भाषावार राज्य रचना कायदा.

नम्रता :- ठीक आहे, छान आहे तयारी ! काय, कसली परीक्षाबिरीक्षा आहे का काय ?

अकबर :- नाही, का ?

नम्रता :- मग कशासाठी ? हे सगळं ?

अकबर :- असावं आपलं लक्षात ! सहज ! माहिती असलेलं काय वाया जाणार आहे का ? असावी माहिती ! आयुष्य चांगलं जायला उपयोगीच पडेल !

नम्रता : - हे असं नसतंच आणि वेगळंच काही घडलेलं असतं तर ? आणि हे एक महत्त्वाचं -- शास्त्रीय माहितीप्रमाणे निसर्गत: मिळालेली स्मरणशक्ती ठरावीक असते. कोणत्याही उपायांनी वा औषधांनी ती वाढवता येत नाही. परंतु मिळालेल्या स्मरणशक्तीचा चांगला उपयोग करायचा असेल तर अनावश्यक गोष्टी स्मरणातून काढून टाकणं फार महत्त्वाचं आहे ! -- हे मी सांगितलेलं मात्र त्यासाठी स्मरणात ठेवायला पाहिजे ! कळलं ?! ( इथे अनाचक ’ मोहे भूल गये सावरिया ’ हे

गाणे म्हणत अँथनी प्रवेश करतो. मागोमाग अमर येतो. नम्रता जाते. या गाण्यावर तिघांचाही रिमिक्स नाच. गाणे संपल्यावर ते तिथेच थांबतात. )

अकबर : - आपल्या तिघांतला सगळ्यांत बेस्ट चांगुलपणा कुठला सांगा बरं !

अमर : - व्हिलनचा आणि धर्माचा काही संबंध नसतो, हे आपल्याला समजतं !

अकबर : - करेक्ट ! आणि व्हिलन आपण धर्मावरनं शोधतही नाही ! तरीही इथं मात्र आपण फेल गेलोत ! व्हिलन अजून सांपडलेलाच नाही !

अँथनी : - आपण तिघंही आईला रक्त देतानाचा सीन आठवला की अजूनही सेंटिमेंटल वाटतं !

अमर : - अकबरच्या गाण्याच्या वेळी अँथनी थिएटरमध्ये खाली पायरीवर बसलेला असतो आणि मधेच तो गाण्याची एक लाईन उचलतो ते आठवलं की अजूनही मलाही शिट्टी वाजवावी असं वाटतं !

अकबर : - तुमची दोघांची पहिली मारामारी कसली घेतलीय ! पण तिथं अँथनी हरला तरी लोकांना इतकं काही वाटत नाही कारण मुख्य काय तर हे दोघे इतके भारी आहेत ! पुढे हे एकत्र येतीलच !

अमर : - जन्मानं तसे आपण हिंदूच असतो रे ! पात्रं म्हणून आपण अवास्तव असलो तरी !

अकबर : - त्याच्यावर कशाला भर देतोस ?

अँथनी :- आणि तेव्हा ते आपल्याला माहीत कुठे असतं ? । ( इथे अकबर आणि अँथनी मंदबुध्दीपणाचे सोंग घेतात – त्यांच्यांत पुढील संवाद - – अमर एंजॉय करत राहतो -- )

अकबर :- तुला आंतरराष्ट्रीय इतिहास आयोग माहिती आहे ?

अँथनी :- नाही.

अकबर :- पण आहे तसा एक आयोग. तर त्यांनी ’ इतिहास ’ कशाला म्हणायचं याचं मुख्य लक्षणच बदलून टाकलंय. पूर्वी पन्नास वर्षांपूर्वी जे घडलं त्याला इतिहास म्हणायचं असं ठरलं होतं -- आता तो कालावधी, कमी करण्यात आला आहे -- आता, तीस वर्षांपूर्वी जे घडलं त्याला ’ इतिहास ’ म्हणायचं असं ठरलं आहे.

अँथनी :- आता सगळंच फास्ट झालंय ना, त्यामुळं आता कमी वेळात जास्त इतिहास घडतो !

अकबर :- उलट, आता थोडक्या वेळात, जुना काळ जास्त लांब जात असेल !

अँथनी :- हे मला कळलं नाही, पण, मला वाटतं इतिहास वाचून वाचून लोक शहाणे झाल्यामुळं आता मतमतांचा गल्बला लौकर खाली बसत असावा !

अकबर :- म्हणजे धुरळा ?

अँथनी :- हो.

अकबर :- दुसरं एक महत्त्वाचं सांगू का, इतिहास घडवणारी माणसं ही साधारण पन्नास पंचावन्नच्या पुढचीच असतात. ती बरीच म्हातारी झाल्यावर किंवा मेल्यावरच इतिहास लिहावा असं म्हटलं तरी तीस वर्षं खूप झाली !

अँथनी :- किंवा पन्नास वर्षं म्हटलं की एवढी वर्षं ते पुरावे वगैरे जपून ठेवले तरी त्यांचे अर्थ वगैरे अंधुक होण्याचा धोका वाटला असेल !-- म्हणजे मतमतांचा धुरळा तर खाली बसावा पण घडलेल्या घटनांचा अर्थ तर अंधुक होऊ नये, असा हा मध्य काढलेला दिसतो ! तीस वर्षं !

अकबर :- पण या दोन्ही गोष्टी शंभर टक्के टाळल्या जाणं मला तरी अशक्य दिसतं ! इतिहासातलं वास्तव निसटतच राहणार हातातून – त्यामुळं सध्याच्या वास्तवावरचा त्याचा परिणामही बदलत राहणार --

अँथनी :- ते ठीक आहे पण त्यामुळं इतिहासच नाकारायचा असं तर करून चालणार नाही ! जसं आपल्या भूतकाळाशिवाय आपलं व्यक्तिमत्व नाही तसंच देशाच्या इतिहासाशिवाय देश कसा असेल ?

अकबर :- जेवढा इतिहास जास्त मोठ्या काळाचा तेवढा देश जास्त मोठा आणि शहाणा असं व्हायला हवं !

अमर : - ( पुढे येत -- ) तसं काही होत नसतं बाळांनो, आर्थिक आणि शस्त्रास्त्रांची शक्ती ज्याची जास्त तो मोठा आणि शहाणा असतो हे लक्षात ठेवा !

अँथनी/अकबर: - करेक्ट ! ( ते जातात. आता देवांचे घर. नम्रताच्या सासूबाई -- मीना -- एक पुस्तक वाचत बसलेल्या. आतून श्री. देव येतात. बसतात. दोन क्षणांनंतर -- )

देव : - घरात हे असं सतत टेन्शन ठेवून उपयोग काय ?

मीना : - तिचं बोलणं, विचार, अपमान करणारे आहेत.

देव : - समजावून द्यावं तिला -- अबोला धरून काय होणार ?

मीना : - ती काही लहान नाही --

देव : - अगं, नवी पिढी आहे -- विचार करणं आणि ते बोलणं यांत आता मोकळेपणा असतो ! आपल्या काळात नव्हतं असं ! पण बदल मान्य करायला हवेत !

मीना : - तुम्हाला तरी रुचतं का पण तिचं बोलणं ? संस्कृतीचं महत्त्वच नाकारणं ?

देव : - तरीही वागण्यात आपण सुसंस्कृतच राह्यला हवं ! नवीनच आलीय ती घरात !

मीना : - मला माझा एखादा अपमान चालवून घेता येईल पण तुमचा नाही !

देव : - आणि तिच्या बोलण्यामुळं खरंच संस्कृतीचं महत्त्व बंद झालं आणि मला आता कामच मिळत नाही असं झालं -- असं होईल ? वेडी आहे ती ! उलट जगभर सांस्कृतिक गोष्टींचं महत्त्व वाढतच जाणार आहे ! माणसाला आयडेंटिटी हवी का नको ! ?

मीना : - मला कशाला समजावताय ? तुमच्या विचाराच्या प्रत्येक पावलावर माझ्या विचाराचं पाऊल टाकते मी ! हल्लीच्या हुशारी करणाऱ्या बायका मूर्ख आहेत ! संसाराची नासाडी करणाऱ्या !

देव : - बघू या -- लगेच इतके टोकाचे विचार कशाला ? ( नम्रता येते. दोघेही गप्प होतात. दोन क्षणांनंतर -- )

नम्रता : - ( मीनाला -- ) रात्रीच्या स्वयंपाकाचं काय करायचंय ? ( मीनाचे पुस्तकात लक्ष. ) अबोला नका धरू असा --

मीना : - ( पुस्तक मिटवत -- ) काय करू मग ? हे किती कष्टातून वर आलेत हे तुला काय कळणार आहे ! तोंड आहे म्हणून बोलायचं ! सगळं जग यांच्या कामाचं महत्त्व मानतं !

नम्रता : - मी त्यांच्याविरुध्द नव्हते बोलत --

मीना : - ( कुत्सितपणे -- ) मला कळलंच नसेल मग ! ( देव उठून आत जातात. )

नम्रता : - माझं म्हणणं तुम्ही पूर्णपणे ऐकून घेतलंत तर कदाचित राग जाईल तुमचा --

मीना : - मला एकच कळतं – सगळ्या जगापेक्षा तुला काही वेगळं वाटत असलं तर तू स्वत:ला सुधार -- जग सुधारायला जाऊ नकोस -- ( बेल वाजते. मीना जाऊन दार उघडते. प्रसाद येतो. दार लावून आत येतो.) -- आणि लक्षात ठेव, मी पुन्हापुन्हा सांगणार नाही -- तुझं हे असलं कौतुक इथं चालणार नाही -- परिणाम वाईट होतील -- ( आत निघून जातात. नम्रताच्या डोळ्यांत पाणी. डोळे पुसते. प्रसाद जवळ येतो. तिच्या खांद्यांवर हात ठेवतो. इथे बाहेर अमर, अकबर, अँथनी येतात. )

अँथनी : - नीट चालावं रे बाबा हिचं ! आपण याच्यात काही करूही शकत नाही !

अकबर : - प्रसाद प्रेमळ वाटतोय पण ! बघ कसा धीर देत उभा आहे ! तिच्याकडून बाकी सगळं, म्हणजे त्याच्या सुखाचं, नीटच असणार नं -- त्यामुळं तो तरी तिच्या बाजूला राहील असं वाटतंय --

अमर : - पण रडली कशी काय ती ? तिच्या डोळ्यांत पाणी ?

अकबर : - का, ती माणूस नाही ?

अमर : - तिचे विचार आपल्यालाही खटकतच गेले तर ? कुठला तरी एक धर्म आपला मानून मग सगळ्या धर्मांत एकी मानायची, असं काही दिसतच नाहीय तिचं ! तिची का चिंता वाटावी आपल्याला ?

अँथनी : - आपण काही फार बुध्दिमान नाही -- नुसतं पाहू काय होतंय ते --

अमर : - असं नाही -- आपल्याही डोक्यांत खूप काय काय येत असतं -- आपण दुर्लक्ष करतो -- इथं आपण सावध राहू या -- ( इकडे प्रसाद--नम्रता दृश्य अंधारात जाते. अमर, अकबर, अँथनी जातात आणि ठकार येतात. )

ठकार : - मध्यस्थ तसे खूप ठिकाणी असतात हो, मध्यस्थ लागतातच ! पण ते कसे काही ना काही फायद्यासाठी काम करणारे असतात -- मुख्यत: आर्थिक फायदा ! माझं तसं थोडंच आहे ? मध्यस्थ असलो तरी ? आता आपण जुळवून दिलेले संसार या पृथ्वीच्या पाठीवर चालत राहणं -- याचं समाधान वाटणं, हा मात्र होतो बरं का फायदा ! हाही होऊ नये ? वेळ जाणं, समाधान वाटणं, थोडासा मोठेपणा मिळणं -- एवढंही नको ? एवढाही फायदा न मिळता काम करणं म्हणजे बेशुध्द असलेला एखादा पेशंट कसा श्वासोच्छ्वास करतो तसं होणार ते ! अहो, नीट बघितलं तर माणसं जगतातच कशासाठी मग ? काही ना काही मिळवत राहण्यासाठीच ना ? जाऊं द्या ! आपला काही तो धंदा नसल्यामुळं त्या जोडप्यांचं चांगलं चालावं या काळजीचा एक त्रास !
( जातात. लगेच ते तिघे -- )

अकबर : - टॉलस्टॉयची ' वॉर अॅन्ड पीस ' ही कादंबरी १८६६ ची ना रे ?

अँथनी : - हो.

अकबर : - आणि मार्क्सचा ' दास कॅपिटाल ' हा ग्रंथ १८६४ चा ना ?

अँथनी : - हो. वाचलंस काय हे सगळं ? ( अमर मोठ्यांदा हसतो. )

अकबर : - काय मारतो का काय मला ? पानं किती आहेत माहीत आहे का ? चल ! ( जातात. आता संतांचे घर. रामदास बसलेले. सरिता भाजी निवडतेय. )

रामदास : - मला तर काळजीच वाटतेय -- ती एकदा नीट तिथं रुळली म्हणजे बरं ! किंवा खरं म्हणजे त्यांनी तिला रुळवून घेतलं म्हणजे बरं !

सरिता : - सगळं होईल -- काही काळजी करू नका --

रामदास : - माझ्या त्या स्वतंत्र विचाराच्या पॉईंटला तुम्ही सगळ्यांनी विरोध केलात --

सरिता : - त्याचा काहीही प्रश्न येणार नाही -- माझे तरी विचार तुम्हाला कुठं पटत होते आणि अजून तरी पटतायत ? चाललाच आहे ना संसार !

रामदास : - ठकार जरा काळजीतच वाटले !

सरिता : - त्यांनी जुळवून दिलेले संसार म्हणजे स्वत:चेच संसार समजतात ते ! जणू काय ती त्यांची वाढीव आयडेंटिटीच ! त्यामुळं घाबरतात ते ! ( उठत -- ) जाऊ द्या -- स्वयंपाक व्हायचाय माझा -
( जातात. रामदास विचारात बसून. )

रामदास : - ( स्वत:शीच -- ) सारखं फोन करणंही वाईट दिसेल -- ( क्षणभराने हे दृश्य संपते. आता देवांच्या घरातले दृश्य. प्रसाद आणि नम्रता बोलत बसलेले. )

प्रसाद :- मला वाटतं, तू बाबांना सॉरी म्हणावंस ! ते नाही म्हटलं तरी दुखावले गेलेत ! आईही तुझ्याशी बोलत नाहीय ! हे असं वातावरण किती दिवस ठेवायचं ? आणि मोठ्या माणसांना सॉरी म्हणण्यात अपमान कसला ? शेवटी रूटीन तर चालायलाच हवं ! आणि एक लक्षात घे, मीही विचारस्वातंत्र्याचा भोक्ताच

आहे पण ते वेड्यासारखं वापरण्यात पॉईंट नाही एवढंच माझं म्हणणं आहे. शेवटी, प्रत्यक्ष जगण्यात कुठंतरी एक समजुतीचा मध्य काढूनच वागावं लागतं असं अनेकदा माझ्या लक्षात येतं. मिनिटामिनिटाला भांडणं, वाद असं करत गेलं तर आपणच भरकटून मॅड होण्याचाही धोका असतो. ते टाळायला हवं असं नाही तुला वाटत ? मग अनुभवातनं शिकणं, परिपक्व होत जाणं याला काय अर्थ राहणार नाही तर ?

नम्रता :- अनुभवातनं शिकणं आणि परिपक्व होणं हे फक्त ऑफिसकामात वगैरे होतं. एरवी तसं काही होत नाही.

प्रसाद :- हेही एक अतिरेकी विधान आहे -- यात तथ्य असलं तरी हे काही पूर्ण सत्य नाही. अनुभवाखेरीज माणसाच्या वागण्याला कोणताही पाया असू शकत नाही.

नम्रता :- कदाचित याच निष्कर्षामुळं जगाची सगळी वाट लागलीय आणि लागत राहणार आहे. पण ठीक आहे. खूप नम्रपणे मी त्यांच्याशी बोलायला तयार आहे.

प्रसाद :- ठीक आहे मग. ( तो हाक मारतो -- ) आई, बाबा -- ( दोघेही सावकाश चालत बाहेर येतात. ) बसा जरा -- हिला तुमच्याशी बोलायचं आहे.

नम्रता : - ( त्या दोघांना -- ) मला खरंच कुणालाही दुखवायचं नव्हतं. तुम्ही दुखावला गेला आहात याचं मला खरंच वाईट वाटतं -- त्याबद्दल मी तुमची क्षमा मागते --

मीना : - ठीक आहे -- यापुढं बोलताना विचार करत जा म्हणजे झालं -- आपण कुणाशी काय बोलतोय --

नम्रता : - विचार करूनच बोलते मी -- ( वर्तमानपत्र उघडत -- ) आता हेच बघा -- आजच्या वर्तमानपत्रातली हेडलाईन -- ' इतिहास एकतर्फी असल्यास बदलण्यात गैर काय --पंतप्रधान. ' आता हे बघितलं की माझ्या काही लक्षात येतं, तर मी काय करणार ?

देव : - काय येतं तुझ्या लक्षात ?

प्रसाद : - आणि आता मात्र प्रॉब्लेम होऊ देऊ नकोस !

नम्रता : - इतिहासाचं विश्लेषण म्हटलं की मार्क्सिस्ट लोक त्यातले स्पेशालिस्ट समजले जातात. तोही पुन्हा एक प्रॉब्लेमच होतो.

प्रसाद : - हं, पुढे बोल.

नम्रता : - त्यांनी लिहिलेल्या आपल्या इतिहासात महात्मा गांधीजींवर फक्त चाळीस पानं तर कम्युनिस्ट पक्षावर दीडशे पानं ! -- हे काय गुपचुप खपून जाईल का ? म्हणून चाललाय हा प्रश्न ! आता आपल्या इतिहासाचा प्रवास लालकडून भगव्याकडे होतोय असं म्हणतायत लोक ! ( इथे अचानक अमर, अकबर, अँथनी येतात. ' ये लाल रंग कब मुझे छोडेगा ' या गाण्यावर नाच. मग जातात. ) आता हे रंग तरी कसे येतात ? -- जे तपशील वा पुरावे मिळतच नाहीत त्यांचा प्रश्नच नाही पण जे मिळतात -- त्यांतले काही तपशील वगळणं किंवा त्यांना कमी महत्त्व देणं, त्यांच्याकडे काणाडोळा करणं, त्यांचे अर्थ वेगळेच भासतील अशा पध्दतीनं ते मांडणं, वगैरे पध्दती त्याला उपयोगी पडतात. मग आता रंगहीन इतिहास आणायचा कुठून ?

देव : - हे बघ नम्रता, शिवाजी महाराजांना लुटारू म्हणणारा इतिहास आम्ही नाकारतो -- त्यांना ' जाणता राजा ' म्हणणाराच आमचा खरा इतिहास !

नम्रता : - ब्रिटिशांनी लिहिलेल्या इतिहासाचं पुनर्लेखन केलं पाहिजे -- आपला इतिहास आपणच लिहिला पाहिजे -- हा तर उद्घोषच आहे !

मीना : - योग्यच आहे ना पण ते ! इतिहास हा स्फूर्तिदायकच असायला पाहिजे ! उत्साहभंग करणारा इतिहास काय कामाचा !

नम्रता : - पण एक सांगा - इंदिरा गांधींनी लागू केलेल्या आणीबाणीला आता होऊन गेली तीस वर्षं. समजा तो इतिहास ल्याह्यचा ठरला, तर तो कोण लिहिणार याच्यावरच तो कसा लिहिला जाणार हे ठरणार नं ! आणि आणीबाणीला चांगली किंवा वाईट न म्हणणारा इतिहास कसा असेल ? नुसतीच आपली तारीखवार घटनांची नोंद ?

मीना :- बरं मग ?

नम्रता :- शिवाय इतिहास कसाही लिहिला तरी तो वाचणारा पुन्हा आपल्या पध्दतीनं वाचू शकतो हेही एक आहेच !

देव :- मग काय इतिहास लिहूच नये ?

नम्रता :- मला तर उलट असं वाटतं -- आग्रह नाही -- हे जे तीस वर्षांपूर्वीचं म्हणतात ना, त्याऐवजी साधारणपणे गेल्या तीस वर्षांत काय -- कसं घडलं, एवढं माहीत असलं तरी पुरे होईल ! अर्थात हे मला कुठल्या हेकटपणातून मांडायचं नाहीय. पण याही विचारात तथ्य आहे एवढंच म्हणायचंय ! माझ्या तर असं लक्षात येतं की एवढ्या या गोंधळात -- काहीही बोललं तरी त्यात थोडा तरी बरोबरपणा असतोच।

देव :- आणि मग त्याच्या आधीचा इतिहास काय करायचा ?

नम्रता :- ज्यांना हौस आहे, आवड आहे, ते करत बसतील अभ्यास -- लिहितील, वाचतील -- पण चांगलं जगण्यासाठी त्याची कितपत गरज आहे याची मला शंका आहे.

देव :- म्हणजे मराठीच्या प्राध्यापकांपाठोपाठ इतिहासाचे प्राध्यापकही घरी पाठवायचा विचार दिसतोय तुझा !

नम्रता :- हे टिकवलं पाहिजे, ते टिकवलं पाहिजे अशी भाषणं आपण नेहमी ऐकतो पण मारूनमुटकून कुठलीही गोष्ट टिकवता येते का ? प्रसारमाध्यमांमुळे लोककला मरत चालल्यायत -- त्या टिकवण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत -- असं एक भाषण मी वाचलं. म्हणजे काय करायचं ?

देव :- म्हणजे काळाप्रमाणे जे होईल ते होऊ द्यावं !?

नम्रता :- अहो आपणच तर काळ ! आपल्यामुळेच घडतो ना काळ ! आणि आपणच आपल्या विरुध्द बोलत राहतो ! हा आंतर्विरोध तर सतत चालूच असतो ! कित्येक गोष्टी काळाच्या पडद्याआड कुणी घालवल्या ?

प्रसाद : - नम्रता, खड्डयात गेलं ते सगळं ! मोकळ्या पोकळीत कुणालाही जगता येणार नाही हे स्पष्ट आहे, त्यामुळं तुझ्या या बडबडीचा काहीच उपयोग नाही --

मीना : - ए, जाऊं दे बाबा, आम्हाला दुखवायचं नव्हतं ना तिला, बास झालं ! हे असलं नकोच आता !

नम्रता : - पण आपण सगळे थोडेफार शिक्षित आहोत -- विचार करू शकतो -- तर आपण टाळाटाळ करू नये असं मात्र मला वाटतं --

देव : - बरं, ठीक आहे, चला -- उगीच सारखा खुराक नकोय डोक्याला ! ( उठतात. या दृश्यावरचा प्रकाश मंद होत जातो. आता अँथनी रंगीबेरंगी पोषाखात येतो. )

अँथनी : - अहो, इतिहास म्हणजे माणसाचं आतलं शरीर ! आणि बाहेरचं शरीर काय कमी महत्त्वाचं असतं की काय ! गेल्या दशकामध्ये सौंदर्यशास्त्रानं लक्षणीय प्रगती केलेली आहे. चेहऱ्याच्या सौंदर्यात बाधा आणणाऱ्या अनेक गोष्टी, उदाहरणार्थ सुरकुत्या, व्रण, तीळ, मस, काळसर डाग, वांग, भावनादर्शक ठळक रेषा, कपाळावरील आठ्या, काही जन्मखुणा, अनावश्यक केस, अनावश्यक चरबी इत्यादी नष्ट करणे आता शक्य झालेले आहे. कॉस्मेटिक सर्जरीव्दारे नाकाचा, हनुवटीचा आकारही बदलता येतो. खप्पड -- ओघळलेले गालही वर आणता येतात. ओठांना - स्तनांना फुगीरपणाही आणता येतो.

( क्षणभराने -- ) आता मला सांगा, असं सगळं होत असल्यावर मुळातच सगळं नीट असणाऱ्यांचं काय विशेष महत्त्व राहणार हो ? उलट ते मागंच पडतील ! देणगी देता येतेय म्हणून ठराविक कॉलेजात प्रवेश मिळतोय -- असंच होणार हे ! पण जाऊं द्या ! जगातलं सौंदर्याचं प्रमाण तरी वाढतंय ना, म्हणजे सगळ्यांच्याच सुखात भर पडतेय --हे आपण बघायचं ! ( तो जात असतानाच अचानक ’जादूचे प्रयोग ’ -- ’ जादूचे प्रयोग ’ -- असे आनंदाने ओरडत अमर एकीकडून दुसरीकडे जाते. नंतर अकबर येतो. अंथनीला विचारतो -- )

अकबर : - अहो, इकडे ते जादूचे प्रयोग कुठे आहेत हो ?

अँथनी : - तिकडे -- इथून सरळ -- तिकडे -- ( दोघेही जातात. आता अमर, अकबर, अँथनी येतात. )

अँथनी : - हे अवघड आहे सालं ! त्यांचा वाद होतोय -- मिटतोय -- पुन्हा वाद होतोय -- पुन्हा मिटतोय !

अकबर : - हे असं कायम चालू शकेल ?

अँथनी : - बरं, ती त्यांना दुखवण्यासाठी मुद्दाम बोलते असंही नाही --

अमर : - यालाच स्वतंत्र विचार म्हणायचं का काय ? काहीच मान्य न करणं ?

अकबर : - अवघडच दिसतंय --

अमर : - आपण जरा बाजूला होऊ या -- हे ठकार आणि देव काय बोलत चाललेत ते बघू या -- ( ठकार आणि देव एकीकडून बोलत येतात आणि दुसरीकडे जातात. )

देव :- इतकं हे असं आहे हे माहीत नव्हतं तुम्हाला ?

ठकार :- अहो, फक्त ती जरा स्वतंत्र विचाराची आहे एवढं माहीत होतं. पण आता बघा, याचा अर्थ आपण चांगलाच करतो ना ! आता माझ्याबद्दल आदर असलेले लोक मला स्वतंत्र विचाराचा म्हणतात ! एवढंच कशाला, तुम्हाला आणि प्रसादलासुध्दा मी स्वतंत्र विचाराचे समजतो ! म्हटलं हे चांगलं जमेल ! पण, म्हणजे एवढं कठीण वाटतंय तुम्हाला ? ( जातात. )

अँथनी : - म्हणजे काही खरं दिसत नाही आता --

अकबर : - किती काळ चालेल असं ?

अमर : - आपलं मारामारीचं कौशल्यही इथं काही उपयोगी पडणार नाही -- काय करावं तरी काय ! आणि तिची बाजू काय आहे हेही कळत नाहीय ! आपण तिचं रक्षण का करतोय हेही कळत नाहीय --

अँथनी : - आतलंही एक शरीरच आणि बाहेरचंही हे एक शरीरच असं तो म्हणत होता ! तर मग शरीर जर का एकूणच चांगलं ठेवता आलं तर ओके होईल सगळं ? सगळे संबंध ? सगळं जगणं ?

अमर : - तुझ्या शंका एकदम ओके आहेत -- इथे तो आपला लुकड्याचा सीन घेऊन टाकू -- महत्त्वाचा आहे – शरीराचं हे सगळं येऊ दे -- आपल्यात एकी साधायला ते बरं आहे ! बोलव त्याला -- ( अँथनी, अकबर ’ लुकड्या ऽ लुकड्या ऽ ’ करत जातात. अकबर लुकड्या म्हणून अँथनीला घेऊन येतो. )

अँथनी :- ( हा नावाप्रमाणेच असून, कंटाळत, आळोखे पिळोखे देत बोलतो -- ) व्यायामाने शरीरातील सर्व पेशींत प्राणवायूचे प्रमाण वाढते. रक्तात ’ एंडोर्फिन ’ नावाचा द्रव वाहतो -- ज्यामुळे तरतरी येते, उत्साह वाटतो आणि ताजेतवाने वाटते. वजन नियंत्रित राहते. चेहरा स्वच्छ व उल्हसित दिसतो. शारीरिक बांधा प्रमाणबध्द राहतो. अन्नपचन सुरळीत होते. दुपारी झोप येत नाही. निद्रादोष नाहीसे होतात आणि कमी तासांची झोप पुरते. मानसिक स्वास्थ्य सुधारते आणि चिडचिडेपणा नाहीसा होतो. सर्व सांधे, स्नायू आणि महत्त्वाच्या सर्व अवयवांची, विशेषत: हृदयाची कार्यक्षमता सुधारते. व्यायामाने एचडीएल नावाच्या कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढते, त्यामुळे हृदयविकाराला प्रतिबंध होतो. त्याचबरोबर, अपायकारक कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे उच्च रक्तदाब आणि हृदयविकार यांना आळा

बसतो. नियमित व्यायामाने दीर्घायुष्य लाभते. दिवसाच्या चोवीस तासांतला फक्त अर्धा तास व्यायामासाठी बाजूला ठेवणे आवश्यक आहे. ही रोजची तीस मिनिटे तुमची कार्यक्षमता, निर्णयशक्ती, आत्मविश्वास आणि आशावाद वृध्दिंगत करून, व्यायामासाठी घालवलेल्या वेळेची केव्हाच भरपाई करून देतात. ( क्षणभराने -- ) बरोबर आहे हो सगळं, पण आहे तेवढी शक्ती व्यायामात खर्च करून काय करू ? ( हळूहळू जातो. )

अँथनी : - ( पुन्हा येत -- ) बाकी सगळं ठीक आहे पण व्यायामामुळं एकमेकांतले क्लॅशेस बंद होतात असं काही आलं नाही यात !

अकबर : - त्या दोघांचं तरी नीट चाललं म्हणजे बरं !

अमर : - लेखन किंवा कोणतीही कला या विषयावर त्यांच्यात संवाद होऊ नये म्हणजे झालं ! बघू या ! पुढचा सीन तोच आहे ! ( ते जातात. आता देवांचे घर. प्रसाद काहीतरी लिहीत बसलेला. नम्रता आतून चहाच्या दोन कपबशा घेऊन येते. एक त्याला देते. एक स्वत: घेते. तो लिहिणे थांबवून चहा घ्यायला लागतो. )

प्रसाद : - तुला स्वत:ला हे चुकीचं नाही वाटत ? तुझ्यामुळं कुणी पुन्हापुन्हा दुखावलं जाणं -- पुन्हापुन्हा समझोता करत बसणं ? अं ?

नम्रता : - याच्यावर काय करावं तेच कळत नाही --

प्रसाद : - तरी बरं -- आपल्यात बरं आहे -- फारसा वाद नाही --

नम्रता : - मला हौस नाही त्याची -- आणि मी मुद्दाम काहीच बोलत नाही --

प्रसाद : - तरीही हे असं घडत राहतं सगळं ! --

नम्रता : - संस्कृतिविकासाचं तत्त्वच आहे म्हणतात -- ' आव्हान आणि प्रतिसाद ' -- मी जर एखादं – एखाद्या प्रश्नाचं – आव्हान घ्यायचं ठरवलं तर माझ्यामुळं तुम्हालाही आव्हानात्मक वाटू शकतं --

प्रसाद : - स्वत:ला कृष्ण, बुध्द यांच्यापेक्षा श्रेष्ठ नको समजूस --

नम्रता : - आपण स्वत:ला त्यांच्यापेक्षा कमी लेखून सुरुवात करणं म्हणजे ते काय म्हणतायत हे समजून घ्यायला नकार देणं ! त्यांचीही तशी अपेक्षा नसावी !

प्रसाद : - ( जणू स्वत:शी -- ) माझ्या लेखनाबद्दल तसं बरं बोलतेस म्हणा तू !

नम्रता : - ' बरं ' ! बरोबर !

प्रसाद : - अं ? म्हणजे एकदोन स्टार फक्त ? तीनही नाहीत ?

नम्रता : - माझ्या मतात खरंच इंटरेस्ट असेल तर असं लाईटली नाही बोलता येणार --

प्रसाद : - चलो ! सीरीयसली बोलेंगे !

नम्रता : - ( जरा भावनिकपणाने -- ) दुसऱ्या महायुध्दाच्या पूर्वकाळात जर्मनीत इतकी चलनवाढ झाली की हॉटेलात कॉफी मागवल्यानंतर तिची किंमत चुकती करेपर्यंत किंमतीत शंभर टक्के वाढ झालेली असायची. अलीकडच्या काळात रशियात चलनवाढीचा दर इतका प्रचंड झाला की पूर्वी सोळा रुबलला एक डॉलर मिळत असे तो आठ हजार रुबलला -- म्हणजे पाचशे पट वाढ -- मिळायला लागला. यामुळं बरेच लोक कंगाल झाले. तालिबान्यांनी जरी बुध्दमूर्ती फोडल्या असल्या तरी यांगोन इथं एक प्रचंड बुध्दमूर्ती उभारण्यात येत आहे. ही भव्य आकाराची पांढऱ्या संगमरवराची बुध्दमूर्ती ही जगातली सर्वात मोठी बुध्दमूर्ती असणार आहे. चारशे टनांहून अधिक वजनाची ही मूर्ती सदोतीस फूट उंच असणार आहे. या मूर्तीमुळं त्यांच्या देशात आणि सर्व जगात शांतता निर्माण होईल अशी आशा म्यानमार देशात व्यक्त केली जात आहे. मन स्थिर करण्यासाठी अनावश्यक गोष्टी स्मरणातून काढून

टाका -- असं मानसशास्त्रज्ञ म्हणताहेत. सर्व बाजूंनी धो धो कोसळणाऱ्या माहितीचं ज्ञानात रूपांतर कसं करायचं हे तज्ज्ञांसमोरचं मोठं आव्हान आहे. मार्केट हे आता आजचं कुरुक्षेत्र होतं आहे. आणि शेवटचं पण महत्त्वाचं -- शिक्षणात उपयुक्ततावादाला महत्त्व येत आहे. आता जीवनात प्रत्यक्ष उपयोगी पडणारं शिक्षण हवं आहे. मानव्य विद्याशाखेला आता महत्त्व नाही. अभिजात वाङ्मय, तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, नीतीशास्त्र -- या विषयांचा काही उपयोग नाही, अशी भूमिका मांडली जाते आहे. ऊर्जा आणि तंत्रज्ञान महत्त्वाचे. सिध्दान्त, तत्त्वज्ञान, विचारसरणी यांचं महत्त्व सर्वच राष्ट्रांमध्ये कमी कमी होत चाललं आहे. आता यातून हे लोक मूल्यविवेक कसा करणार ही काहींना काळजी आहे. भाषेचा समर्थ वापर समजावा हे ठीक पण त्यासाठी काव्य, नाटक, कथा, कादंबरी इत्यादी वाङ्मय शिकण्याची गरज नाही अशी भूमिका काहीजणांच्या बोलण्यात आहे ! काय असेल या सगळ्याच्या मुळाशी असा खरंच मला प्रश्न पडतो ! खरंच !

प्रसाद : - शोधून काढ मग ! सापडल्यावर मलाही सांग !

नम्रता : - विदीर्णता ! सगळ्यांच्या मनांची विदीर्णता असते याच्या मुळाशी ! शंकाच नाही ! एकमेकांवर आपटणारी हजारो मनांची विदीर्णता ! हे असं व्हायलाच हवं का असा मग पुढचा प्रश्न पडतो ! अटळ असतं का हे ?

प्रसाद : - मी जरा कच्चा आहे या सगळ्या अभ्यासात ! तूच बोल --

नम्रता : - तू कच्चा कसा ? तू लेखक आहेस -- कथालेखक -- एक कलाकार ! तुमच्या गावाकडचं विश्व खूप बारकाईनं तुझ्या लक्षात आहे आणि लहान मुलाच्या एक प्रकारच्या निरागसपणानं तू ते तुझ्या कथांतून मांडतोस -- मानवी जीवनाचा तळ शोधतोस -- तू कच्चा कसा ?

प्रसाद : - हं ऽ -- म्हणतात काही समीक्षक असं !

नम्रता : - एक समीक्षक म्हणाले होते की तुझ्या अमुक एका कथेत आदिबंधात्मक मातृप्रतिमेचा प्रत्यय येतो -- बरं येतो -- त्यामुळं काय होतं ? अमूक प्रत्यय ! -- सो व्हाट ?

प्रसाद : - म्हणजे काय ? तेवढं पुरेसं आहे ! ते पूर्णही आहे !

नम्रता : - विदीर्णता आणि पूर्ण !

प्रसाद : - पूर्णत्वाकडे जायलासुध्दा आधी विदीर्णता समजावी लागते !

नम्रता : - अच्छा अच्छा, म्हणजे तुम्ही जे कलावंत लोक असता -- कुणी दाढी वाढवलेले, कुणी केस वाढवलेले, कुणी दोन्ही वाढवलेले, झब्बा घालणारे, खूप जागरणांनी विस्कटलेले -- तर तुम्ही जेव्हा असे हवेत खोल बघत बसलेले असता तेव्हा ते विदीर्णता समजून घेणं चाललेलं असतं तर !

प्रसाद : - चेष्टा कशाचीही करता येते -- त्याला अक्कल लागत नाही --

नम्रता : - मी गंभीरपणेच बोलतेय --

प्रसाद : - मानवी दु:खाच्या उद्गारातूनच महान कलाकृती जन्म घेते -- हे सत्य माणसाला समजून खूप वर्षं झाली !

नम्रता : - एखादा दु:खी माणूस हे बोलला आणि बाकीच्या दु:खी माणसांना हे पटलं रे ! पण दु:ख, विकृती, वेडेपणा, हिंसा यांचं प्रक्षेपण करणाऱ्या कलाकृती महत्त्वाच्या ठरायची कारणं कुठली असतात ? रचनाकौशल्य, भाषा, चमत्कृती, अलंकार, प्रतिमा -- ही ! वेडेपणाच्या उदात्तीकरणाला आपण ' सांस्कृतिक ' समजतोय की काय हे पाह्यला नको ?

प्रसाद : - सांस्कृतिक प्रवास हा वर्षानुवर्षं चालू आहे ! आज त्यात वेगळं काही नाही !

नम्रता : - वेगळं आहे ! आज तुम्हा कलावंतांपुढं एक वेगळंच -- कधी आलं नव्हतं असं -- आव्हान येऊ

पाहतंय -- एक तर उपयुक्ततेच्या तत्त्वावर उभारलेला कधी नव्हे एवढा मोठा नकार येतोय -- आणि मुख्य म्हणजे रोजच्या जगण्यातच या विदीर्णतेचा इतका तीव्र अनुभव लोकांना येतोय की आता पुन्हा तोच अनुभव कलेतून घ्यायचा असेल तर लोक पाठ फिरवणार आहेत ! सुरुवात झालीच आहे त्याची !

प्रसाद :- मग काय सगळ्या कलाकारांनी टिवल्या बावल्या करत लोकांचं मनोरंजनच करत फिरावं का काय ?

नम्रता :- मनोरंजनवाल्यांना प्रॉब्लेम नाहीय -- प्रॉब्लेम तथाकथित गंभीर -- दर्जेदार लोकांना आहे ! आता मनाच्या विदीर्णतेची कलात्मक व्हरायटी लोकांना नको असेल तर तुम्ही कसं पाहाल याच्याकडे ?

प्रसाद :- तू कलात्मक व्हरायटी म्हणालीस ! यातला ' कलात्मक ' हा शब्द महत्त्वाचा आहे !

नम्रता :- कला मान्य, रचनाकौशल्य मान्य, निरीक्षण, भाषा, विनोद, गांभीर्य मान्य ! पुढे ?

प्रसाद :- पुढे काय -- ते सगळं महत्त्वाचं आहे !

नम्रता :- आणि मग मानवी मूल्यांचं काय करायचं ? की विदीर्णता हेच मूल्य ? आणि विदीर्णता हीच संस्कृती ? हिंसा हेच मूल्य ? हिंसा हीच संस्कृती ? विदीर्णतेतून एकाकीपणाशिवाय आणि हिंसेशिवाय काय निघू शकेल ? आणि आपण जगातला दहशतवाद नष्ट करायला निघालोय !

प्रसाद : - हजार लोक हजार प्रकारांनी पाहतात ! तू कोण ?

नम्रता :- तोच तर आहे मुख्य प्रॉब्लेम ! आपण आपापल्या ताणांतून, आपापल्या विदीर्णतेच्या वेगवेगळ्या रचनांतून वास्तवाकडे पाहतोय, त्यामुळं आपलं प्रत्येकाचं वास्तव वेगळं आहे. ते वास्तव नसून ' जणू काही वास्तव ' आहे. आणि आभास मात्र असा आहे की आपलं सगळ्यांचं वास्तव एकच आहे ! ( क्षणभराने -- ) कोणत्याच संबंधात परिपूर्णता नसणं -- आणि अशी एकूणच विदीर्णता असणं – आणि प्रत्येकाची विदीर्णता वेगवेगळी असणं !

प्रसाद :- हे सगळं खूप जुनं आहे. पूर्वीचे लोक याला ' माया ' म्हणत होते. नथिंग न्यू ! आणि आध्यात्मिक बोगसगिरीत मला इंटरेस्ट नाही ! तुकारामसुध्दा ' रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग '-- असं म्हणत होते !

नम्रता : - अरे वा ! तुकाराम त्यांचं अध्यात्म वगळूनही ग्रेट होते तर ! तुम्हाला ते नुसते कवी म्हणूनही श्रेष्ठ वाटू शकतात ! ते ज्या युध्दाचं बोलतायत ना ते ' नित्य नित्य ' म्हणजे क्षणोक्षणी वारता येणारं म्हणजे नाहीसं करता येणारं युध्द आहे ! कुठल्या ओळी आपण कशासाठी वापरतोय ?

प्रसाद : - एवढं गुंताड्याचं आणि अवघड करण्यासारखं काही नाहीय त्यात ! असंस्कृत आणि सुसंस्कृत यांत फरक असतो ! सिंपल ! जाऊं दे बाकी सगळं !

नम्रता :- आधुनिकोत्तर जमान्यातसुध्दा हे फरक आहेत ? समज काहीच वाढलेली नाही ? चांगली कलाकृती ही आपल्या विदीर्णतेला आव्हान निर्माण करते ! बाकीच्यांत कुणाला आपल्याआपल्यात युगपुरुष म्हणा, शतकातले महान म्हणा किंवा सहस्त्रकातले महान म्हणा, त्याला फारसा काही अर्थ नाही.

प्रसाद :- अनेक प्रकारच्या कलाकृती असतात. अमुक असाव्यात आणि तमुक असू नयेत असं म्हणताच येणार नाही.

नम्रता :- अनेक प्रकारचे युगपुरुषही असतील ! ( इथे अचानक अमर, अकबर, अँथनी प्रवेश करतात. )

अँथनी :- कट् कट् ! कट् करा हे सगळं ! ( नम्रता आणि प्रसादही पुढे येतात. )

नम्रता :- का ?

अँथनी : - आता का ? एक तर तुमचं हे सगळं भांडणाच्या दिशेनं चाललंय ! आणि दुसरं म्हणजे हे कसं व्हायला लागलंय सगळं ? बोधप्रद ! गचाळ ! एखादा माणूस देशभक्ती महत्त्वाची मानतो किंवा एखादा माणूस मार्क्सिझम महत्त्वाचा मानतो आणि त्यामुळे कायम तो स्वत:ला सुपिरिअर समजत राहतो, तसं होतंय हे ! दोघांचंही !

अमर :- नाटकातली पात्रं ही गोंधळणारी, वैतागणारी, चिडणारी, हळुवार होणारी -- अशीच पाहिजेत.

अकबर :- कुणीच श्रेष्ठ नको !

प्रसाद :- अरे, पण तुम्ही हे सगळं अशा ठिकाणी थांबवलंय की माझा महत्त्वाचा पॅरॅग्राफ नेमका राहिलाय ! आता खरं तर मी निर्णायक बोलणार होतो !

नम्रता :- तुम्ही म्हणता ती नाटकं वेगळी -- ती प्रश्नांचं निराकरण हा विषय प्रेक्षकांवरच सोडून देतात ! इथे, या नाटकात, तसं नाहीय ! उत्तरही सांगितलं जाणार आहे ! कुणीतरी श्रेष्ठ असायचा यात प्रश्नच नाही !

अकबर : - आपली आपली थिअरी डोक्यात फिट करून आयुष्यभर त्याच भ्रमात फिरणारे वेडे जगात खूप आहेत ! तुम्ही अशी व्यक्ती वेडी म्हणून दाखवा -- चालेल ! शहाणी म्हणून नको !

नम्रता :- मी वेडीही असू शकते असं म्हणूनच पाहा नं ! हरकत काहीच नाही !

अँथनी :- हां, मग ठीक आहे !

अमर :- बरं, आता थांबलोच आहे तर नम्रताच्या वडिलांचा दातात चांदी भरण्याचा प्रसंग आधी घेऊन टाका -- खरं तर तो जुना आहे -- आधीच कुठंतरी यायला हवा होता -- पण सॉरी -- प्रसाद, तुझा डायलॉग म्हणायची संधी तुला मिळेल, पण जरा वेळानं -- प्ली ऽ ज -- ( प्रसाद, नम्रता, अकबर आणि अँथनी जातात. आता अमर दातांचा डॉक्टर होतो. नम्रताचे वडील रामदास संत येतात. )

रामदास :- नमस्कार डॉक्टर !

अमर :- नमस्कार !

रामदास :- माझ्या दातात चांदी भरलेली होती ती निघाली पण त्यातला एक खडा आत राहिला. म्हटलं असू दे. बघू, पाहू करत राहिलो. एक दिवस नेमका तो खडा चावला गेला आणि दातांच्या फटीत रुतला. कदाचित हिरडीला जखमही झाली. त्यामुळं लगेच एका दातांच्या डॉक्टरकडे गेलो. त्यांनी तो खडा काढला. औषध लावलं आणि दोन दिवसांनी या म्हणाले. तसा गेलो. बॉर्डर केस आहे म्हणाले, पण चांदी भरू म्हणाले. ऐकताय ना डॉक्टर ?

अमर :- तुमचं म्हणणं पूर्ण लक्षपूर्वक ऐकण्यासाठीच मी डोळे मिटलेले आहेत -- बोला तुम्ही !

रामदास :- तर त्यांनी चांदी भरली. म्हटलं दुखायचं थांबेल ना पण ? तर म्हणाले दोन चार दिवसांत ते सेटल होईल -- नाहीतर मग तो दात काढूनच टाकावा लागेल म्हणाले --

अमर :- ( डोळे मिटूनच -- ) हं --

रामदास :- ते काही सेटल झालं नाही -- सध्या थंडीचे दिवस आहेत, एक टूथपेस्ट लिहून देतो ती लावा म्हणाले. तेही केलं. तरी काय सेटल झालं नाही. दुखतंच आहे. म्हटलं असं नको, जरा दुसऱ्या कुणाला दाखवू , म्हणून आलोय !

अमर :- ठीक आहे, चला, बसा या खुर्चीवर ! ( ते उठून तिकडे बसतात. ) हं, तोंड उघडा ! --- ( ते तोंड उघडतात. अमर पाहतो. ) अहो, साधं कारण आहे -- चांदी अशी दोन दातांत एकत्र भरायची नसते -- जरा गॅप हवी -- तर मी फक्त जरा गॅप करतो तिथं -- ( मशीननं खर्रर्र असं पाच सेकंद करतो. ) मला वाटतं तुम्हाला आता रिलीफ मिळेल -- नाही मिळाला तर पाहू काय करायचं ते --

रामदास :- मला आत्ताच पन्नास टक्के रिलीफ वाटतोय -- मग ती टूथपेस्ट ?

अमर :- अहो, ती फक्त दाताला वरनं प्रोटेक्शन देते -- या प्रॉब्लेमचा आणि त्याचा काहीच संबंध नव्हता -- ते जाऊं द्या -- पण तुमची दातांची अवस्था पाहता तुम्ही एक मेटल डेंचर करावं असं मला वाटतं -- म्हणजे उरलेले दातही प्रोटेक्ट होतील आणि पाच दहा वर्षं मग बघायलाच नको -- सुमारे साडेसात हजार खर्च येईल -- बघा --

रामदास :- ( उभे राहून पुढे येत -- ) तिथून ' बरं ' म्हणून सटकलो -- ( अमर जातो. ) ते डॉक्टर हुशार होते यात शंकाच नाही -- कारण माझा प्रॉब्लेम दोन दिवसांत बरा झाला -- त्यांनी दिलेला सल्लाही आदर्श होता यात शंका नाही -- पण एवढे साडेसात हजार खर्च करणारा माणूस मी नाही -- जरा ढकलंपंचीच आहे. त्यांचं चूक नाही -- पहिला डॉक्टर काय किंवा दुसरा काय -- महिना पाचपन्नास हजार मिळाल्याशिवाय चालणार कसे हो हे दवाखाने ? त्यामुळं मला तर वाटतं की या पूर्ण धंद्याचं सरकारीकरण व्हावं -- एकूणच डॉक्टरी धंदा ! पण वारे तर खाजगीकरणाचे आहेत ! आणि समजा सरकारीकरण केलं तरी -- जाऊं द्या -- मी माझे सगळे विचार परत घेतो आणि परत जातो -- सॉरी -- ( जातात. प्रसाद, नम्रता येतात. )

प्रसाद : - हं आता आपला उरलेला सीन - तर तुझं म्हणणं बरोबर का चूक हे बघत बसण्यापेक्षा मला आता वेगळाच मुद्दा लक्षात यायला लागलाय ! विचारस्वातंत्र्य म्हणजे काय तर मतभेदाचं स्वातंत्र्य ! ते मी मान्य करू शकतो पण आपल्याला महामूर्ख समजणाऱ्या व्यक्तीबरोबर आयुष्य कसं काय काढणार ?। वेळीच या गोष्टीकडे लक्ष देणं योग्य होईल ! समजतोय का अर्थ माझ्या बोलण्याचा ?

नम्रता : - मतभेद म्हणजे काय -- वेगवेगळी विदीर्णता !

प्रसाद : - बास आता ! पुढचे सगळे धोके आता माझ्या लक्षात आलेत ! आपलं जमणं शक्य नाही !

नम्रता : - का ? जमण्यात काय प्रॉब्लेम आहे ?

प्रसाद : - जाऊं दे ! बघू ! ( टेबलावरचे कागद नीट ठेवून निघून जातो. ती एकटी काही क्षण उभी. प्रकाश मंद होत जातो. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा – अमर, अकबर, अँथनी येतात. आपापल्या जागा शोधून बसतात. अमर, अकबर, अँथनी आलटून पालटून पुढील वाक्ये म्हणतात -- ' आता हे शेवटचं दृश्य -- ', ' यात तरी काहीतरी हाताला लागतंय का ते बघू -- ', ' तिला काय एवढं कळलंय ते तरी कळेल ! -- ' वगैरे वाक्ये उच्चारत हळू हळू स्थिरस्थावर होतात. आता देवांच्या घरातले दृश्य उजळते. देव, संत यांच्या घरातली सगळी माणसे आणि ठकार बसलेले आहेत. )

नम्रता :- ( उभी राहात -- ) मी तुमचं सगळ्यांचं म्हणणं अगदी लक्षपूर्वक ऐकलेलं आहे. मला तुम्हाला हे सांगायचंय की तुम्ही काळजी करावी, संतापावं असं यात काही नाही. उलट आपल्या सगळ्यांच्या दृष्टीनं महत्त्वाचं असं काही मला सांगायचंय. मी जे सांगणार आहे ते एक शारीरिक सत्य आहे, पण प्रयोगशाळेत सिध्द झालेलं, मशीनवर दिसलेलं असं ते सत्य नाही. अजून तरी नाही. सध्या आपण याला एक कार्यसाधक सत्य म्हणू शकतो. माझ्यासारखी एक क्षुद्र मुलगी ते सांगतेय याच्यावरच फक्त भर न देता कृपा करून ऐका. हजारो, लाखो प्रश्न हे आपण सतत मानसिक अंगानं गेल्यामुळं निर्माण होतात आणि हे लक्षात येण्याची एक अगदी सोपी पध्दत आहे. जसं एका छोट्याशा दुरुस्तीनं माझ्या बाबांचा दाताचा प्रश्न सुटला तशी ! हे लक्षात यायची पूर्व अट एकच आहे -- स्वत:ला क्षुद्र, सामान्य, वाईट समजून सुरुवात न करणं ! मी काहीही आध्यात्मिक बोलणार नाहीय, पण जिथे विज्ञान, धर्म, कला, तत्त्वज्ञान -- हे सर्व एका सत्यात येऊन पोचतील अशी ही एक साधी गोष्ट आहे !

अमर :- ( उभा राहात -- ) हा फक्त शून्यवाद आहे !

अँथनी :- किंवा फुलीवाद ! सगळीकडे फुल्या मारत जाणं ! हे योग्य नाही होणार --

अकबर :- असलं, सगळ्यांतनं सुटणारं काहीही असू शकत नाही – आपण भोळेभाबडे तर नाही होऊ शकत --

अँथनी :- कोट्यवधी माणसं सडत, बोंबलत गेली -- आणि अजूनही तेच चालू आहे -- असं काय असणार आहे -- वेगळं ? ( अमर , ' ए, खाली बस -- ' म्हणतो. तो बसतो. पुढे -- )

नम्रता : - हा फक्त मेंदूच्या वापराचा प्रश्न आहे. तसं पाहिलं तर एका अर्थानं मेंदू आपल्या शरीरभर पसरलेला

आहे. पण त्याचा मुख्य भाग माकडहाडापासून, पाठीच्या कण्यातून, मानेतून कवटीपर्यंत आणि कवटीच्या आत असा आहे. मेंदूचा खालचा भाग हा नेहमी वरच्या भागावर नियंत्रण ठेवायच्या प्रयत्नात असतो. या दोन्ही भागांतली तणावरेषा, या भागात -- म्हणजे माकडहाडापासून कवटीपर्यंत -- कुठेही असू शकते. आपला मेंदूच असा विभक्तपणे कार्यरत असल्यामुळे सगळ्या गोष्टींत विभक्तपणा येतो आणि परिणामत: विदीर्णता येते. मेंदूचं हे असं चालणारं कार्य म्हणजेच मन ! -- यातला महत्त्वाचा भाग असा की नियंत्रण ठेवण्याच्या सतत प्रयत्नात असणारा मेंदूचा भाग हा स्वत:ही स्वत:च्या ऐच्छिक क्रियेच्या क्षेत्रात असतो. त्यामुळे ही त्याची नियंत्रणाची क्रिया, समजल्यावर, सहजच तो सोडून देऊ शकतो. अशा पध्दतीनं, जाणीवपूर्वक, मेंदू खालपासून वरपर्यंत नियंत्रणताण सोडत जाऊ शकतो. ही ताणरहितता मानेच्या जरा वरपर्यंत आल्यावरच मी जे म्हणतेय त्याची – म्हणजे विदीर्णता नाहीशी होत जाण्याची -- झलक मिळते. त्याच्यापुढं ज्याचं त्याला सगळं कळत जाऊ शकतं. -- हे घडत असतानाच, आपल्या मनाची क्रिया नसलेली अशी परिपूर्ण जिवंतता आपल्याला जाणवायला लागते -- म्हणण्यापेक्षा --आपल्यात अवतीर्ण होते. ही वैश्विक जाणीव असते. बास ! यातच सगळं रहस्य आहे. सगळी दु:खं, वेदना, संघर्ष, हिंसा यांचा उगम या मेंदूच्या नियंत्रण-ताणातून होतो. याहून अधिक काही नाही. हीच गोष्ट मानसिक परिणामांच्या पध्दतीनं बोलायची झाली तर हजारो पानांचे अगणित ग्रंथ तयार होऊ शकतात. तसे तयार झालेलेही आहेत. सध्या तुम्ही हा माझा वेडेपणा समजा, पण माझ्या प्रामाणिकपणाबद्दल शंका घेऊ नका. हे असं लक्षात आलेलं असूनही मी गप्प बसावं का ? मी ही गोष्ट अनेकदा पडताळलेली असूनही ? या नियंत्रण-ताण सोडत जाण्याच्या क्रियेतून पूर्ण शरीरात फरक पडत असलेले आपल्याला जाणवू शकतात. ( क्षणभराने -- ) माझं हे निरीक्षण मेडिकल शास्त्राला धरून नसेलही कदाचित पण हे निश्चितपणे एक कार्यसाधक सत्य आहे -- ते तसं का आहे याचा जरूर शोध घ्यायला हवा --

देव : - अवघड आहे ! ( संतांकडे पाहतात. )

मीना : - विचित्र आहे !

संत : - काहीतरीच बाबा -- ( सरिताकडे पाहतात. ती गप्प. )

ठकार : - कल्पना हो एकेक !

प्रसाद : - तुझं झालं बोलून की सांग, कारण माझा निर्णय मला सांगायचा आहे --

नम्रता : - मानवी कृतींच्या सगळ्या क्षेत्रांतल्या गोंधळाचं मूळ या ताणात आहे. नियंत्रण-ताण सोडत जाण्याच्या कृतीतून जे वास्तव अवतीर्ण होतं तेच फक्त, सगळ्यांचं एकच असू शकणारं असं एकमेव वास्तव असतं. आणि तेव्हाच लक्षात येतं की आपण जे वास्तव समजतोय ते आहे फक्त ' जणू काही वास्तव ' ! आणि हे ' जणू काही वास्तव ' हे फक्त विनाशाच्याच दिशेनं जात राहणार यात काहीच शंका नाही. कारण हे एकाकीपणा, विदीर्णता, संघर्ष आणि हिंसा यांची निर्मिती करणारंच असतं ! किंबहुना ते स्वत:च ही सगळी छळयुक्त विनाशप्रक्रिया असतं ! नरक असतं ! निवड आपण करायची असते – जगण्यातली सगळ्यांत महत्त्वाची निवड ! जणू काही वास्तव की वास्तव ?। आपण आपल्या सगळ्यांच्या असलेल्या अशा एकमेव वास्तवाला वाव देणार की नाही देणार ?

प्रसाद :- झालं ? ठीक आहे. याच्यावर मी आता काही उपरोधिक वगैरे बोलत नाही, पण, मला काही या स्त्रीबरोबर पुढे संसार करत राहणं जमणार नाही ! आणि हा माझा निर्णय आहे ! ( उठतो आणि आत निघून जातो. काही क्षण शांतता. मग अमर, अकबर, अँथनी उभे राहतात. )

अँथनी : - ती बोलतेय ते तिला खरंच वाटतंय मात्र !

अकबर : -	पण हजारो वर्षांत कुणीच असं बोललं नसेल !

अँथनी : -	वैश्विक जाणीव ! वा !

अकबर : -	धार्मिक दिसतंय काहीतरी ! पण हे तर अलग आहे – सगळ्यांचं एकच ?

अमर :-	यात, आपल्या कुणाच्या धर्माविरुध्द तर काही नाही ना ? पण वेळ वाया गेला असंच वाटतंय --

अकबर :-	भावना दुखावणारं तरी काही वाटत नाहीय.

अमर : -	पण कुंडलिनी वगैरेही काही दिसत नाहीय ! माझ्या एक लक्षातच येतंय की आपण तिचं रक्षण वगैरे काही करू शकणार नाही कारण, तो ताण म्हणजेच आपापला व्हिलन स्वत:तच आहे, असं काहीतरी तिचं म्हणणं दिसतंय. आणि कहर म्हणजे, इथली ही सगळी पात्रं वास्तव आणि आपण अवास्तव – काल्पनिक, हेही सगळं तिनं विस्कटून टाकलंय. आता आपल्याला रोलच नाही.

अकबर :-	पण मग धर्माचं काय ? मला सगळाच डाऊट वाटतोय.

अँथनी :-	हिच्यापेक्षा आपल्या पिक्चरमधल्या हिरॉइन्सच्याच रक्षणाला पळू या !

अमर :-	हा एक भ्रम असेल असंच मला वाटतंय -- ही मुलगी, म्हणजे -- एवढी काही वेगळी नाही वाटत ! आपण उगीचच आलो इकडे ! चला ! ( जातात. )

देव :-	आता आम्ही काय बोलणार याच्यावर ?

ठकार :-	आता मी काय म्हणतो ते बघा -- बघा, सध्या तरी ऐकाच माझं -- ( संतांना --) सध्या आपण हिला घरी घेऊन जाऊ -- हे सगळं काही फायनल समजायला नको -- पुन्हा शांतपणे एकमेकांचे विचार देणं-घेणं होऊं द्या नंतर -- आत्ताच लगेच काही यात शेवट गाठणं शक्य होणार नाही -- आणि करूही नये तसं ! -- अं -- बदल होऊ शकतात -- अं --

संत :-	ठीक आहे -- काय करणार मग ? ( सरिताकडे पाहतात. )

ठकार :-	चला, चलू या मग ! आत्ता उगीच शब्दानं शब्द वाढायला नको ! ( सगळे उठतात. देव पतिपत्नीही दिङ्मूढ. )

संत :-	( नम्रताला -- ) चल बेटा ! ( त्यांना हुंदका येतो. सरिता त्यांच्या पाठीवर हात ठेवते. ते तसेच उभे राहतात. नम्रता देव पतिपत्नींकडे पाहते आहे. इथे हे दृश्य फ्रीझ होते आणि त्यावरचा प्रकाश मंद होतो. अमर येऊन ओरडतो -- ' गोली मार भेजेमे ' ! अँथनी आणि अकबर यांच्या हसण्याचे आवाज. मग ते दोघेही प्रवेश करतात, हसतात. मग या गाण्यावर, झिंग आल्याप्रमाणे नाच करत राहतात. ओरडत -- खिदळत राहतात. मागचे दृश्य तसेच ... काही क्षण...पडदा पडत जातो... )

**-- अंक दुसरा समाप्त –**

--- ००० ---

**सूचना:- सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.**

लेखक - चं.प्र.देशपांडे,

३, स्नेहदीप अपा., चिंतामणीनगर, सहकारनगर नं.२, पर्वती, पुणे ४११००९.

दूरध्वनी -- ९३७१००५७७३.	संकेतस्थळ ( वेबसाईट ) – www.champralekhan.com